
रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
• वर्ष १८ • अंक ९९
www.ramprahar.com
• सोमवार, २७ ऑक्टोबर २०२५ • पाने ८ • किंमत ₹ २

## सणासुदीत स्वदेशी वस्तूंच्या खरेदीत प्रचंड वाढ –पीएम मोदी



**नवी दिल्ली :** देशभरात सध्या जीएसटी बचत महोत्सव सुरू असून यामुळे नागरिकांमध्ये खूप उत्साह आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून त्यांनी रविवारी (दि.२६) देशवासीयांशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा १२७वा भाग होता. यंदा सणासुदीच्या काळात स्वदेशी वस्तूंची खरेदी प्रचंड वाढली असून कोणकोणती स्वदेशी उत्पादने आपण खरेदी केली याबद्दल नागरिकांनी संदेश पाठवून कळवल्याचेही पंतप्रधानांनी सांगितले. येत्या ३१ ऑक्टोबरला लोहपुरुष सरदार पटेल यांच्या जयंती दिनाचे स्मरण करून त्यांनी योगदानाला उजाळा दिला. यानिमित्त देशभरात आयोजित होणाऱ्या 'रन फॉर युनिटी'मध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. येत्या ७ नोव्हेंबर रोजी वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवाला प्रारंभ होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## अंतरंग

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विविध विकासकामांचा शुभारंभ/२
एक्स्प्रेस वेच्या पुलावरून पडून एकाचा मृत्यू/५
महिला वर्ल्डकप : उपांत्य फेरीच्या लढतींचे चित्र स्पष्ट/८

# 'दिबां'च्या नावासाठी पाठपुरावा सुरूच ठेवणार

### विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीचा बैठकीत निर्धार



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

लोकनेते दि.बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीची बैठक रविवारी (दि. २६) वाशी येथील नवी मुंबई स्पोर्ट्स क्लबमध्ये झाली. या वेळी 'दिबां'च्या नावासाठी पाठपुरावा सुरूच ठेवण्याचे सर्वानुमते ठरले. या संदर्भात कृती समितीचे शिष्टमंडळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहे.

या बैठकीस कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, सल्लागार जगन्नाथ पाटील, जे.एम. म्हात्रे, सरचिटणीस दीपक म्हात्रे, सहचिटणीस संतोष केणे, राजेश गायकर, खजिनदार जे.डी. तांडेल, सदस्य 'दिबां'चे पुत्र अतुल पाटील, दशरथ भगत, रूपेश धुमाळ, ॲड. भारद्वाज चौधरी, सुरेश पाटील, राजाराम पाटील, विजय गायकर यांच्यासह इतर पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला देण्यात यावे यासाठी राज्य सरकारने ठराव मंजूर करून केंद्र सरकारला पाठवलेला आहे. याबाबत केंद्रातील मोदी सरकारही अनुकूल असल्याचे काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले होते. याच अनुषंगाने पुढे पाठपुरावा करण्याचे वाशी येथील बैठकीत ठरले.

# शेकाप ग्रामपंचायत सदस्यासह कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली असून शेतकरी कामगार पक्षाला पुन्हा एकदा धक्का बसला आहे. शेकापचे तुराडे ग्रामपंचायतीचे विद्यमान सदस्य विलास पाटील यांनी समर्थक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह रविवारी (दि. २६) भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला.

पनवेल मार्केट यार्डमधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या पोयंजे पंचायत समितीच्या आढावा बैठकीत हा पक्षप्रवेश झाला. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी सर्व प्रवेशकर्त्यांचे भाजपमध्ये स्वागत केले.

आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वाखाली पनवेल आणि उरण मतदारसंघात भाजपकडून विविध विकासकामे होत आहेत. त्यांचे सक्षम नेतृत्व आणि कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून अनेक पक्षांचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते भाजपमध्ये दाखल होत आहेत. याच अनुषंगाने तुराडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच चंद्रकांत भोईर यांच्या नेतृत्वाखाली विद्यमान ग्रामपंचायत सदस्य विलास पाटील तसेच नागेश पाटील, प्रवीण जाधव, प्रकाश शिंदे, भीमराव कुंभार, बासू राठोड, राजू राठोड, सुनील राठोड, लक्ष्मण कोकाटे, राम कोकाटे, प्रेम राठोड, दिनेश कांबळे, किरण राठोड, अजय कोकाटे, नवनाथ त्रिभोन, महेश दोडमणी, संतोष कोकाटे, रवी जेबाशी, राजू मुन्ना राठोड, प्रशांत ओव्हळ यांनी 'कमळ' हाती घेतले.

या पक्षप्रवेश कार्यक्रमास भाजप तालुका सरचिटणीस तथा माजी जि.प. सदस्य राजेंद्र पाटील, माजी पं.स. सदस्य जगदीश पवार, माजी नगरसेवक बबन मुकादम, भाजप दक्षिण मंडळ अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष प्रवीण खंडागळे, तानाजी खंडागळे, **(पान २ वर..)**

# फरारी पीएसआय शरण; कोठडीत रवानगी

**फलटण : प्रतिनिधी**

फलटण उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टरवर बलात्काराचा आरोप असलेला पोलीस उपनिरीक्षक गोपाळ बदने शनिवारी रात्री उशिरा शरण आला. त्याला न्यायालयाने ३० ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.



डॉ. संपदा मुंडे यांनी गुरुवारी रात्रीफलटण येथे एका हॉटेलमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली होती. संबंधित डॉक्टर महिलेने आपल्या हातावर पीएसआय गोपाळ बदने याने चार वेळा बलात्कार केल्याचे, तर प्रशांत बनकर याने मानसिक छळ केल्याचे लिहिले होते.

**महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरण**

या घटनेनंतर आरोपी पीएसआय गोपाळ बदने हा फलटणमधून पसार झाला होता. त्याच्या शोधासाठी पोलिसांची पथके विविध ठिकाणी रवाना झाली होती. शनिवारी रात्री उशिरा बदने हा फलटण शहर पोलीस ठाण्यात स्वत:हून हजर झाला. त्याची सध्या कसून चौकशी सुरू आहे.

## रील बनविण्याच्या नादात दोन तरुणांचा रेल्वेखाली मृत्यू

**जळगाव :** सुरत–भुसावळ मार्गावर जळगाव जिल्ह्यातील पाळधी रेल्वेस्थानकानजीक रील बनविण्याच्या नादात दोन तरुणांचा धावत्या रेल्वेगाडीखाली आल्याने मृत्यू झाला. ही घटना रविवारी (दि. २६) सकाळी ११च्या सुमारास घडली. प्रशांत पवन खैरनार (१८) आणि हर्षवर्धन महेंद्र नन्नवरे (१८, दोघे रा. पाळधी, जि. जळगाव), अशी अपघातातील मृत तरुणांची नावे आहेत. दोघेही रविवारची सुट्टी असल्याने पथराड गावाकडील गेटलगत रील बनवत होते. त्याच वेळी धरणगावकडून जळगावच्या दिशेने जाणारी अहमदाबाद–हावडा सुपरफास्ट एक्स्प्रेस आली. कानाला हेड फोन लावले असल्याने प्रशांत आणि हर्षवर्धन यांना जीव वाचवण्याची कोणतीच संधी मिळाली नाही.

## निवडक

### पाककडून अभिनेता सलमान खान दहशतवादी म्हणून घोषित

**लाहोर :** पाकिस्तान सरकारने भारतीय अभिनेता सलमान खानला अतिरेकी म्हणून घोषित केले आहे. सलमानने सौदी अरेबियातील एका कार्यक्रमात पाकिस्तान आणि बलुचिस्तान यांचा वेगवेगळा उल्लेख केला होता. यामुळे पाकिस्तान सरकारला मिरच्या झोंबल्या आणि शाहबाज सरकारने अधिसूचना जारी करत सलमानला थेट दहशतवादी म्हणून घोषित केले आहे.

### छत्रपती संभाजीनगर स्टेशन नामकरणाची औपचारिकता पूर्ण

**मुंबई :** सुमारे तीन वर्षांपूर्वी औरंगाबादचे नाव बदलून छत्रपती संभाजीनगर करण्यात आले होते, मात्र तेव्हा शहरातील रेल्वेस्थानकाचे नामांतर झाले नव्हते. आता अखेर या स्टेशनचे नावही औपचारिकरित्या छत्रपती संभाजीनगर रेल्वेस्थानक असे करण्यात आले आहे. मध्य रेल्वेने नाव बदलाची घोषणा केली असून यासोबतच नव्या स्टेशनचा कोडही जारी करण्यात आला आहे.

# खराब हवामानाचा पर्यटकांनाही फटका

### बोटी समुद्रात न उतरल्याने जंजिरा किल्ला बंद!

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूडजवळील प्रसिद्ध जंजिरा किल्ला पाहण्यासाठी दिघी, खोरा आणि राजपुरी जेट्टीवरून शेकडो पर्यटक येत असतात. दिवाळीच्या दिवसांत तर पर्यटकांची संख्या वाढली आहे, मात्र रविवारी (दि. २६) खराब हवामानामुळे शिडाच्या व इंजिन बोटी समुद्रात न उतरल्याने जंजिरा किल्ला न पाहता पर्यटकांना परतावे लागले.

या संदर्भात खोरा येथील बंदर निरीक्षक प्रमोद राऊळ यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, भारतीय हवामानशास्त्र विभाग प्रादेशिक केंद्र, कुलाबा, मुंबई यांच्याकडून अरबी समुद्रात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे किनारपट्टीवर सावधगिरी बाळगण्यासंदर्भात पत्र आले आहे. वादळाची शक्यता लक्षात घेत राजपुरी ते जंजिरा आणि दिघी ते जंजिरा या मार्गावरील प्रवासी जलवाहतूक बंद केली असून फक्त आगरदांडा ते दिघी रो–रो फेरी हवामान पाहून चालवली जात आहे.

राजपुरी येथील बंदर निरीक्षक प्रभाकर पवार म्हणाले की, हवामान खराब असल्याने पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शिडाच्या व इंजिन बोटी बंद ठेवण्यात आल्या आहेत.

बोटमालक जावेद कारभारी यांनी सांगितले की, मे महिन्याच्या सुट्टीत लाखो पर्यटक येथे येतात, मात्र शेवटच्या आठवड्यात चक्रीवादळामुळे आर्थिक नुकसान झाले होते. आता पुन्हा समुद्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने कधीही लाटा उसळतील या कारणाने पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने मेरीटाईम बोर्डाकडून बोटी बंद ठेवल्या गेल्या आहेत.

पुरातत्व विभागाचे बहुउद्देशीय कर्मचारी प्रकाश घुगरे यांनी, खराब हवामानामुळे अचानक बोटी बंद झाल्याने जंजिरा किल्ल्याचे दरवाजे बंद करावे लागले. जोपर्यंत मेरीटाईम बोर्डाकडून या संदर्भात आदेश येत नाही तोपर्यंत किल्ला बंद राहणार आहे. पर्यटकांनी यांची नोंद घ्यावी, असे आवाहन केले आहे.



पनवेल : टेंभोडे गावातील शिक्षक सुभाष रामा भोईर आणि भाजप पनवेल महिला मोर्चाच्या तालुका सरचिटणीस ॲड. प्रतिभा भोईर यांची कन्या सानिया भोईर हिने वैद्यकीय प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या 'नीट' परीक्षेत उज्ज्वल यश संपादन केले आहे. मेरिटनुसार सानियाची एमबीबीएस पदवीसाठी एमजीएम मेडिकल कॉलेज येथे निवड झाली असून ती लवकरच तिथे प्रविष्ट होणार आहे. सानियाच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन करून तिला पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी सुभाष भोईर, ॲड. प्रतिभा भोईर, यश भोईर उपस्थित होते.

# रायगडात भातपिकाचे नुकसान; सततच्या पावसाने शेतकरी हवालदिल

**नेरळ : प्रतिनिधी**

लांबलेल्या पावसाने कर्जत तालुक्यासह रायगड जिल्ह्यात अक्षरश: थैमान घातले आहे. वादळी पावसाने शेतातील उभे भातपीक आडवे झाले असून भिजून मातीमोल झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे डोळेही पाणावले आहेत.

मे महिन्यापासून सुरू झालेला पावसाळा आता सहा महिने उलटूनही थांबण्याचे नाव घेत नाही. काही शेतकऱ्यांनी लक्ष्मीपूजनाच्या मुहूर्तावर भात कापणी केली होती, तर काहींनी अजून थांबायचे ठरवले होते, मात्र परतीच्या पावसाने दोन्हींना उद्ध्वस्त केले. उभे पीक आडवे झाले आणि कापलेले पीक पाण्यात भिजून नुकसान झाले. तोंडचा घास गेल्याने शेतकरी आता शासनाकडे मदतीची आस लावून आहेत.



प्रशासनातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

# भरकटलेला बोया श्रीवर्धन किनारी



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन येथील जीवना परिसरात रविवारी (दि. २६) सकाळी एक भला मोठा बोया किनारी लागल्याने खळबळ उडाली. स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण होते, मात्र बाणकोट खाडीतून भरकटलेला हा बोया असल्याचे स्पष्ट झाल्याने सर्वांनी सुटकेचा निश्वास सोडला.

खालचा जीवना बंदर येथे चारचाकी वाहनांचे टायर लावलेला बोया वहात आल्याची माहिती मेरीटाईम बोर्डाचे कर्मचारी नितेश तांबे यांनी श्रीवर्धन पोलीस ठाण्यात दिली. त्यामुळे किनारपट्टीवरील भागात खळबळ उडाली. बोया पाहण्यासाठी स्थानिकांनी मोठी गर्दी केली होती. या घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि मेरीटाईम बोर्डाने हा बोया कुठून आला याचा शोध सुरू केला. **(पान २ वर..)**



# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विविध विकासकामांचा शुभारंभ

**सातारा : रामप्रहर वृत्त**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते फलटण येथे नीरा देवघर प्रकल्पाच्या उजवा मुख्य कालव्याच्या दुसऱ्या टप्प्याच्या शुभारंभासह एक हजार ३५२ कोटी रुपये रकमेच्या विविध विकासकामांचे ऑनलाईन भूमिपूजन व लोकार्पण करण्यात आले. फलटण शिंगणापूर रस्त्यावरील नाईकबंबवाडी येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वसाहतीमध्ये एक मोठा (मेगा) औद्योगिक प्रकल्प देण्यासह तालुका व परिसरातील विविध विकास कामे सुरू करण्यात येतील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली.

फलटण येथे आयोजित भूमिपूजन कार्यक्रम व शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री शंभूराजे देसाई, सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंह भोसले, ग्रामविकास व पंचायतराजमंत्री जयकुमार गोरे, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर आदी उपस्थित होते.

फलटण ही ऐतिहासिक आणि सांस्कृतिक भूमी असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, शासनाने या परिसराला दुष्काळमुक्त करण्यासाठी नीरा देवघर कालव्याच्या कामातील अडचणी दूर करून कामाला सुरुवात केली आणि प्रकल्पाचे पाणी फलटण आणि माळशिरसला देणे शक्य करून दाखविले आहे. माणदेशाच्या साहित्यात दुष्काळावरील चित्रण दिसून येते, हा दुष्काळ दूर करण्याचे काम शासनाने हाती घेतले असून सर्व कामे पूर्ण झाल्यावर हरित माणदेश तयार करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, नीरा देवघर, जिहे कटापूर, टेंभू उपसा योजनेचे वेगवेगळे टप्प्यातून दुष्काळी तालुक्यांना पाणी दिले आहे. सांगोल्यासारख्या दुष्काळी भागात पाणी पोहोचविण्यात आले आहे. माळशिरस तालुक्यातील पाण्यापासून वंचित २२ गावांना पाणी देण्यात येईल. नीरा देवघर प्रकल्पातील तीन उपसा सिंचन योजनांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येईल. या परिसराच्या विकासासाठी आणि दुष्काळमुक्तीसाठी शासन येथील जनतेच्या पाठीशी आहे, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस पुढे म्हणाले की, जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या सर्व सुविधा फलटण शहरात आल्या आहेत. प्रशासकीय इमारत, पोलीस ठाणे, न्यायालय आदींच्या माध्यमातून नागरिकांचे जीवन सुकर होणार आहे. येथील विविध विकास कामांना चालना दिली जाईल,

माणगंगा नदीचा समावेश अमृत २ मध्ये करण्यात येईल आणि फलटण येथे न्यायालयासाठी स्वतंत्र इमारत उभारण्यात येईल. फलटण येथील विमानतळाच्या अनुषंगाने सर्वेक्षण करण्यात येईल. फलटण येथील रुग्णालयातील सुविधा अद्ययावत करण्यात येतील, अशी ग्वाही देखील त्यांनी दिली.

कार्यक्रमास कृष्णा खोरे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष महेश शिंदे, आमदार सचिन पाटील, मनोज घोरपडे, अतुल भोसले, राहुल कुल, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, माजी आमदार राम सातपुते आदी उपस्थित होते.

कार्यक्रमात विविध शासकीय योजनांच्या लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात लाभ प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. यात पी. एम. जनमन योजनेंतर्गत घरकुल लाभ, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान, राज्य कृषी यांत्रिकीकरण योजनेच्या लाभार्थ्यांना लाभ प्रमाणपत्र, फळबाग लागवड व सेंद्रिय शेतीमध्ये उत्कृष्ट कामाबद्दल सन्मान, उत्कृष्ट बचत गट, मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान यांना सन्मानित करण्यात आले.

## मराठा समाज भवनाच्या पहिल्या मजल्याचे उद्‌घाटन

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील मराठा समाज भवनाच्या पहिल्या मजल्याचे उद्घाटन भारतीय जनता पार्टीचे नेते व राज्यसभेचे खासदार धैर्यशील पाटील यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. या सोहळ्याचे औचित्य साधून मराठा समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती तसेच खासदार धैर्यशील पाटील यांच्या राज्यसभेवरील नियुक्तीबद्दल मराठा समाजाच्या वतीने त्यांचा जाहीर सत्कारही करण्यात आला. कार्यक्रमात बोलताना खासदार धैर्यशील पाटील म्हणाले, मी आज या ठिकाणी उपस्थित आहे ते तुमच्या वडीलधाऱ्यांच्या आशीर्वादामुळेच. राजकारणात कोण कधी मोठा होईल आणि कोण खाली येईल हे सांगता येत नाही. त्यामुळे मी देवाकडे एवढीच प्रार्थना करतो की, मी कितीही मोठा झालो तरी माझे पाय नेहमी जमिनीवर राहू देत. राजकारणातील सर्वात मोठी संपत्ती म्हणजे नागरिक. त्यांच्या विश्वासामुळेच नेता उभा राहतो आणि पुढे जातो. या कार्यक्रमाला मराठा समाजाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मराठा समाज भवनाच्या पहिल्या मजल्याचे उद्घाटन झाल्याने समाज बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण होते. समाज भवनाच्या माध्यमातून विविध सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रमांना अधिक चालना मिळेल. मराठा समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी खासदार धैर्यशील पाटील यांचा सन्मान शाल, पुष्पगुच्छ आणि स्मृतिचिन्ह देऊन केला. यावेळी अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्ये करत समाजाच्या प्रगतीसाठी एकजूट आणि विकासाचे ध्येय बाळगण्याचे आवाहन केले.

## खोपोली–पेण राज्य मार्गावरील गतिरोधकाची दुरूस्ती करण्याची गरज

**खोपोली : प्रतिनिधी**



खोपोली पेण राज्य मार्गावर गतीवर नियंत्रणासाठी तयार करण्यात आलेल्या गतिरोधकाचा बदललेला आकार वाहन चालकांना धडकी भरवत आहे.

महत्त्वाचा राज्यमार्ग असलेला खोपोली पेण मार्गाचे काँक्रिटीकरण आणि रुंदिकरणाचे सत्तर टक्के काम पूर्ण झाले आहे. या मार्गावर प्रवासी आणि अवजड वाहतूक अव्यहतपणे सुरू असते .रस्ता ऐसपैस झाल्याने वाहन चालक सुसाट वाहने हाकत आहेत. या मार्गावर अनेक अपघात घडल्याने गाव तिथे गतिरोधक बसवण्यात आले आहेत. गतिरोधक तयार करताना नियमांची पायमल्ली देखील झाली आहे .

गतिरोधकावर काही ठिकाणी उंचवटा तर काही खड्डा तयार झाल्याने गतिरोधक धोकादायक बनले आहेत. शिवाय गतिरोधक असल्याची पूर्वसूचना मिळेल असे कोणतेही फलक देखील लावलेले नाहीत

## परतीच्या प्रवासात चाकरमानी, पर्यटकांचे हाल

**अलिबाग : प्रतिनिधी**



दिवाळीची सुटी आटोपून परतणारे चाकरमानी आणि सुटीचा आनंद घेवून निघालेले पर्यटक यांचे परतीच्या प्रवासात मोठे हाल झाले. परतीच्या प्रवासासाठी अलिबाग बसस्थानकात मोठी गर्दी झाली होती. प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता आम्ही अलिबाग ते पनवेल मार्गावर जादा बसेसची व्यवस्था केली होती.

दिवाळीच्या सुटीसाठी आपल्या गावी आलेले चाकरमानी आणि पर्यटक यांनी रविवारी (दि. २६) सकाळपासूनच अलिबाग बसस्थानकात गर्दी केली. दुपारच्या सुमारास ही गर्दी वाढत गेली. त्यामुळे अलिबाग एसटी स्थानक गर्दीने फुलून गेले होते. अनेकांनी गर्दी पाहून जलवाहतूक सेवेचा पर्याय निवडण्याचा निर्णय घेतला परंतु खराब हवामानामुळे शनिवारी संध्याकाळपासूनच मुंबई गेटवे ते मांडवा ही जलवाहतूक सेवा बंद करण्यात आली होती. हवामान खात्याच्या इशारयानंतर रायगडच्या किनारयांवर तीन नंबरचा बावटा लावण्यात आला आहे. त्यामुळे ही सेवा बंद करण्याचा निर्णय मेरीटाइम बोर्डाने घेतला. जलवाहतूक सेवा ठप्प झाल्याने प्रवाशांच्या गैरसोयीमध्ये भर पडली. त्याचा भार एसटी सेवेवर पडला. एसटी स्थानकात प्रवाशांची गर्दी वाढल्याने एसटीची प्रवासी सेवा कोलमडल्याचे पहायला मिळाले. थेट अलिबाग पनवेल सेवेसाठी लांबच लांब रांगा लागल्या होत्या. तासनतास उभे राहून तिकीट मिळवावे लागत आहे.

प्रवाशांची लूट

प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता त्यांच्यासाठी बसेस पुरवताना एसटीच्या अधिकारयांचीही दमछाक होत होती. अलिबाग ते पनवेल मार्गावरील एसटी सेवा अपुरी ठरल्याने अनेक प्रवाशांनी खाजगी सेवेचा पर्याय निवडला. याचा फायदा खाजगी वाहतूकदारांनी घेतला. पनवेलला जाणारया प्रवाशांकडून अधिकचे भाडे आकारले जात होते.

## मशिदीवरील भोंगे उतरवण्यासाठी विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दल आक्रमक

**नेरळ : प्रतिनिधी**



ममदापूर गावातील मशिदीवर लावण्यात आलेले बेकायदेशीर भोंगे व लाउडस्पीकर उतरवावेत, अशी मागणी करत ऍड अमोल सूर्यवंशी,शाम कडव यांनी विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या वतीने ममदापूर ग्रामस्थांसह शेकडो कार्यकर्त्यांनी नेरळ पोलिस ठाण्यात निवेदन सादर केले.

या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, ममदापूर गावातील मशिदीवर तसेच स्थानिक रहिवासी शाकिब पाटले यांच्या घरावर लावलेले भोंगे व लाउडस्पीकर हे सकाळी ५ वाजल्यापासून सायंकाळी ८ वाजेपर्यंत तसेच शुक्रवारी दुपारी मोठ्या आवाजात सुरू असतात. या सततच्या आवाजामुळे गावातील शालेय विद्यार्थी, वृद्ध नागरिक तसेच सर्वसामान्य ग्रामस्थांना मोठा मानसिक आणि शैक्षणिक त्रास सहन करावा लागत आहे.

निवेदनात नमूद केले आहे की, अशा प्रकारचा भोंग्यांचा वापर सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार धार्मिक स्थळांवरील लाउडस्पीकरांचा वापर केवळ प्रशासनाच्या परवानगीने आणि मर्यादित वेळेतच करता येतो. परंतु ममदापूर येथे या आदेशांकडे संपूर्ण दुर्लक्ष केले जात आहे, असा आरोप करण्यात आला आहे.

याप्रकरणी पोलिस प्रशासनाने तात्काळ कारवाई करून संबंधित भोंगे/लाउडस्पीकर उतरवावेत आणि जबाबदार व्यक्तींविरुद्ध कायदेशीर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.हे निवेदन नेरळ पोलिस ठाण्यात देण्यात आले असून, दोन दिवसांत कारवाई न झाल्यास कर्जत उपविभागीय अधिकारी व रायगड जिल्हा अधीक्षक यांच्याकडे दाद मागून धरणे आंदोलन छेडण्याचा इशारा विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी दिला आहे.या वेळी कार्यकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयाचा आदेश पाळा – भोंगे उतरवा!, गावात शांतता राखा अशा घोषणा देत पोलिस प्रशासनाला निवेदन सादर केले.

## ‘उबाठा’ दक्षिण रायगड माजी जिल्हा संपर्कप्रमुख नागेंद्र राठोड भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत करणार पक्षप्रवेश

**माणगाव :** शिवसेना ठाकरे गटाला लागलेली गळती थांबायचं नाव घेत नाही. गेल्या काही दिवसापूर्वी रायगड जिल्हा सर्पक प्रमुख नागेंद्र राठोड यांनी पदाचा राजीनामा पक्ष प्रमुख उध्दव ठाकरे यांच्या कडे दिला होता. त्यानंतर नागेंद्र राठोड कोणत्या पक्षात जाणार या बाबत कोणतीही महिती समोर आली नव्हती. मात्र येत्या २८ आक्टोंबर ला मंगळवारी मुंबई येथील भाजप कार्यालयात प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीमध्ये अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते सोबत भाजपात प्रवेश करणार आहेत.

त्यामुळे शिवसेना ठकारे गटाला हा मोठा धक्का रायगड मध्ये भाजपने दिला आहे. नागेंद्र राठोड यांच्या भाजप प्रवेशा मुळे दक्षिण रायगड मध्ये भाजपची ताकद वाढणार आहे. आगामी जिल्हा परिषद निवडणूकीच्या तोंडावर झालेला पक्ष प्रवेश भाजपासाठी महत्वाचे मानले जाते.

शिवसेना ठाकरे गटात ते अनेक वर्षे काम करत होते. लोकसभा आणि विधानसभा निवडणूकीत मोठी जबाबदारी त्यांना पक्षाकडुन देण्यात आली होती. निवडणूकी नंतर रायगड मधील पदाधिकारी यांच्यात गटातटाच्या राजकारणाला कंटाळून त्यांनी पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर त्यांना अनेक राजकीयपक्षा कडुन ऑफर होत्या. मात्र ते कोणत्या पक्षात जाणार हे स्पष्ट झाले नव्हते. मात्र अखेर त्यांनी भाजप मध्ये जाणाचा निर्णय घेतला आहे. येत्या २८ ऑक्टोबर प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण याच्या उपस्थितीत ते भाजप मध्ये प्रवेश करणार आहे.

## शहापूरची कन्या सुजाता मडकेची ‘इस्रो’मध्ये निवड

**ठाणे : रामप्रहर वृत्त**



यशाला शॉर्टकट नसतो, पण जिद्द, मेहनत आणि स्वप्नांवर विश्वास असेल तर अवकाशातही भरारी घेता येते या शब्दात परिवहन मंत्री श्री. प्रताप सरनाईक यांनी भारतीय अंतराळ संशोधन संस्थेमध्ये शास्त्रज्ञ म्हणून निवड झालेल्या मोटार परिवहन विभागात वाहन निरीक्षक म्हणून कार्यरत असलेल्या शहापूर तालुक्यातील शिरगाव (जि. ठाणे) येथील सुजाता रामचंद्र मडके हिचे अभिनंदन केले आहे! सध्या ठाणे शहरातील मोटार परिवहन विभागात वाहन निरीक्षक म्हणून कार्यरत असलेल्या सुजाता मडके यांची प्रतिष्ठित भारतीय अंतराळ संशोधन संस्था मध्ये शास्त्रज्ञ म्हणून निवड झाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाने केवळ संपूर्ण परिवहन विभागाचा गौरव वाढवला आहे. असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी केले आहे. साध्या शेतकरी कुटुंबातून आलेल्या सुजाता यांनी आपल्या शिक्षणात सातत्य राखत, आयुष्यभर कष्ट आणि चिकाटीचा आदर्श घालून दिला. त्यांच्या यशामागे आई–वडिलांचे संस्कार, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि स्वतःची अविरत मेहनत यांचा सुंदर संगम दिसून येतो.

पान १ वरुन

## शेकाप ग्रामपंचायत सदस्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते भाजपमध्ये

उत्तर कार्यकारिणी सदस्य देविदास पाटील, भाताण ग्रामपंचायतीचे सरपंच तानाजी पाटील, जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष अविनाश गाताडे, पंचायत समिती विभागीय अध्यक्ष प्रतिक भोईर, दक्षिण मंडळ महिला अध्यक्ष रेश्मा माळी, अनंता पाटील, बारवईचे सरपंच निलेश बाबरे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

या प्रवेशानंतर भाजप दक्षिण मंडळ कार्यकारिणी सदस्यपदी कृष्णा जुमारे, बूथ क्रमांक ९०च्या अध्यक्षपदी अरुण पाटील आणि पोयंजे गाव कमिटी उपाध्यक्षपदी अशोक भोईर यांची नियुक्ती झाल्याबद्दल जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## भरकटलेला बोया श्रीवर्धन किनारी

श्रीवर्धन तालुक्यातील बागमांडला ते मंडणगड तालुक्यातील बाणकोटदरम्यान खाडी पुलाच्या पिलरचे काम चालू असून रत्नागिरी जिल्ह्यातील बाणकोट सागरी पोलीस ठाणे हद्दीत एक बार्ज बुडाला होता. बुडालेला हा बार्ज समुद्रातून वर खेचण्याकरिता बोया बांधला होता, मात्र खराब हवामानात बोयाचा दोर तुटून समुद्रात वाहून गेला. हा बोया रविवारी सकाळी श्रीवर्धन येथील किनाऱ्याला लागला. त्यामुळे ही संशयास्पद वस्तू नसून परिसरातील नागरिकांनी घाबरून जाऊ नये, असे आवाहन पोलीस निरीक्षक उमेश पाटील यांनी केले आहे.

## रोह्यात वाऱ्यासह जोरदार पाऊस, जनजीवन विस्कळीत

**रोहा : प्रतिनिधी**



दीपावलीच्या सणामध्ये सातत्याने पावसाने सायंकाळी हजेरी लावली आहे. याची पुनवृत्ती पुन्हा एकदा रवीवारी सायंकाळी झाली असुन जोरदार पावसाने हजेरी लावली आहे. दुपारी काळोखमय वातावरण होत वाऱ्यासह जोरदार पाऊस रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात पडला आहे.

रविवार सुट्टीचा दिवस असल्याने बाजारात आलेल्या ग्राहकांची पावसामुळे हिरमोड झाली आहे नागरिकांची तारांबळ उडाली आहे.

वाऱ्यासह जोरदार पाऊस आल्यामुळे वीज खंडित झाली आहे. रोहा तालुक्यात भात कापणी सुरू आहे. परंतु आलेल्या पावसामुळे या भात शेतीचे नुकसान झाले आहे. शेतात पाणी साचल्याचे दिसून येते. भातशेती कापल्यानंतर पाण्यात गेली.तर काही ठिकाणी उभा भात अडवा झाला आहे. त्यामुळे भाताचे नुकसान झाले आहे.मोठ्या प्रमाणात पाऊस रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात पडला आहे सायंकाळी सुध्दा पावसाची रिप रिप चालू होती

## खालापुरात मंगळसूत्र चोरी करणारा आरोपी अटकेत

**खोपोली : बातमीदार**

पायी चालत जाणाऱ्या महिलेचे मंगळसूत्र चोरणा–या अट्टल चोराला खालापूर पोलीस पकडले असून अनेक चो–यांचा उलगडा होणार आहे .मिळालेल्या माहितीनुसार सीमा ज्ञानेश्वर मोरे वय३९ रा. साळोख कर्जत या भाऊबीजेच्या दिवशी नावंढे ते घोडवली सकाळी साडेअकराच्या सुमारास चालत माहेरी निघाल्या होत्या. त्याच दरम्यान दुचाकी वरुन आलेल्या चोरट्यांनी ३५हजार रुपये किंमतीचे मंगळसूत्र खेचून पळ काढला होता. याबाबत दिवाळी सण आणि घरच्या लोकांच्या भीतीने सीमा यांनी उशीरा तक्रार खालापूर पोलीस ठाण्यात दाखल केली. तक्रार दाखल होताच पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी तातडीने तपासाची सूत्र फिरवत मंगळसूत्र चोरटा जयेश देशमुख ( खोपोली) याला ताब्यात घेतले. या अगोदर देखील देशमुखवर गुन्हे दाखल असून आणखी काही गुन्हे उघडकीस येणार आहेत.

**दुखवटा**

## चंद्रकांत कडव



**नागोठणे :** ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत कडव यांचे शुक्रवार दि. २४ ऑक्टोबर रोजी पहाटे लालबाग मुंबई येथील राहत्या घरी वयाच्या ७७ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, तीन मुली, सात नातवंडे व चार भाऊ, वाहिनी, पुतणे, पुतणी असा मोठा परिवार आहे . त्यांचा दशक्रिया विधी रविवार दि. २ नोव्हेंबर रोजी शुगार तळा येथे व ऊत्तरकार्य ४ नोव्हेंबर रोजी राहत्या घरी होणारआहे

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त कळंबोलीत रक्तदान शिबिर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाच्या अमृत महोत्सवानिमित्त भाजप कळंबोली पक्ष कार्यालय येथे पाचव्या रक्तदान शिबिराचे आयोजन आमदार प्रशांत ठाकूर व माजी महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली युवा मोर्चा कळंबोली मंडळाच्या वतीने करण्यात आले होते. या शिबिरामध्ये रक्तदात्यांनी मोठ्या संख्येने रक्तदान केले.

रक्तदान शिबिराच्या वेळी भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर पाटील, जिल्हा चिटणीस रविशेठ पाटील, माजी नगरसेवक बबन मुकादम, रवींद्र भगत, भाजप भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, मंडळ सरचिटणीस दिलीप बिस्ट, सरस्वती काथारा, सुनीता हिरवळे, निलेश भोईर, प्रकाश शेलार, अमर ठाकूर, घनश्याम शर्मा, संदीप भगत, विलास किटे, राजेश पांडे, विष्णू गायकवाड, जमीर शेख, अझर शेख, दत्तात्रय भिसे व पक्षातील वारिष्ठ नेते, सर्व सन्माननीय नगरसेवक-नगरसेविका, महिला मोर्चाच्या सर्व पदाधिकारी, युवा मोर्चातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपक्रमास चांगला प्रतिसाद लाभला.





**पनवेल : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आकाशवाणीच्या माध्यमातून मन की बात कार्यक्रमाचा १२७वा भाग सादर केला. या कार्यक्रमात पंतप्रधान मोदींनी देश-विदेशातील लोकांशी आपले विचार शेअर केले. या भागामध्ये पंतप्रधान मोदींनी जीएसटी बचत उत्सवाचा विशेष उल्लेख करत सांगितले की, यंदा स्वदेशी वस्तूंच्या खरेदीमध्ये मोठी वाढ झाली आहे या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण पनवेल येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात आयोजित करण्यात आले होते. या वेळी भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रक्षेपणावेळी भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, प्रवीण खंडागळे, तानाजी पाटील, अविनाश गाताडे यांच्यासह अन्य पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.**

## रुग्णालयात मृतदेहांची अदलाबदल

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमधील डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनानंतर मृतदेहांची अदलाबदल झाल्याचा प्रकार उघड झाला आहे. खारघरमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केलेल्या २६ वर्षीय सुशांत मल्ला या तरुणाचा मृतदेह चुकीने दुसऱ्या नेपाळी कुटुंबाला देण्यात आला. त्यांनी अज्ञानातून त्याचे अंतिम संस्कारही करून टाकले.

दोन्ही मृत व्यक्ती तरुण वयातील आणि मूळ नेपाळ येथील असल्याने हा गोंधळ झाल्याचा दावा करण्यात आला आहे. दोघांचे मृत्यू गळफासानेच झाले होते. शवविच्छेदनानंतर रुग्णालयात मृत्यू झालेल्या २५ वर्षीय तरूणाच्या नातेवाईकांनी चुकीचा मृतदेह ओळख करून ताब्यात घेतल्यामुळे पोलीस आणि रुग्णालय प्रशासनावर निष्काळजीपणाचे आरोप सुशांत यांच्या नातेवाईकांनी केले आहेत.

नियमांनुसार मृतदेहाची जबाबदारी घटनेची चौकशी करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याची असते तसेच रुग्णालय व्यवस्थापनाने मृतदेह ताब्यात देताना खात्री करणे गरजेचे होते. पनवेलचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अशोक गीथे यांनी सांगितले की, दोन्ही कुटुंबे नेपाळी असून मृत व्यक्तींची वये आणि ओळख सारखी होती. या घटनेची संपूर्ण चौकशी करण्यासाठी आम्ही त्रिसदस्यीय समिती स्थापन करणार आहोत. यापुढे अशी घटना घडू नये यासाठी नियमित प्रक्रियेनुसार मृतदेह हस्तांतरण केली जाईल. या घटनेनंतर रुग्णालयात दोन्ही नातेवाईकांमध्ये समन्वयासाठी बैठक झाल्यानंतर अस्थी विसर्जनासाठी त्यांच्या नातेवाईकांना देण्यात आल्या.

## दि म्हसळा टाइम्स दिवाळी अंकाचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते प्रकाशन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिवाळी सणाचे औचित्य साधून कोकणातील दि म्हसळा टाइम्स या वृत्तपत्राच्या दिवाळी अंकाचे प्रकाशन समारंभ नुकताच पनवेल येथे पार पडला. माजी खासदार आणि लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते या अंकाचे प्रकाशन करण्यात आले.

या वेळी पत्रकारितेतील उल्लेखनीय योगदानासाठी देवेंद्र भुजबळ यांना लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते माध्यमभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा माध्यमभूषण पुरस्कार दि म्हसळा टाइम्सच्या वर्धापन दिनानिमित्त रुक्मिणी पांडुरंग पोटले चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई आणि आदर्श शैक्षणिक समूह संचलित डी. डी. विसपुते अध्यापक विद्यालय व आदर्श टीचर्स ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने प्रदान करण्यात आला.

या वेळी देवेंद्र भुजबळ यांनी लिहिलेले माध्यमभूषण हे पुस्तक लोकनेते रामशेठ ठाकूर यांना भेट दिले आणि त्यातील व्यक्तीरेखांविषयी सविस्तर माहिती दिली. पुस्तक चाळल्यानंतर लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी, या पुस्तकामुळे मराठी साहित्यविश्वात एका वैशिष्टयपूर्ण पुस्तकाची भर पडली आहे, असे गौरवोद्गार काढत भुजबळ यांचे अभिनंदन केले.

या कार्यक्रमावेळी दि म्हसळा टाइम्सचे संपादक रमेश पोटले, न्यूज स्टोरी टुडे च्या निर्मात्या अलका भुजबळ, पत्रकार गणेश कोळी, रवींद्र मालुसरे, ज्येष्ठ लेखक सुनील चिटणीस, देवेंद्र भुजबळ, मुंबई मराठी वृत्तपत्र वाचक संघांचे चंद्रकांत मालुसरे, श्री चव्हाण, मनोहर मांदाडकर, लीना रटाटे, रमेश पाखड, शंकरमोडसिंग, स्वागत पोटले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सर्वांना शुभेच्छा देण्यात आल्या.







**पनवेल : भाजप दक्षिण मंडळ कार्यकारिणी सदस्यपदी कृष्णा जुमारे, बूथ क्रमांक ९०च्या अध्यक्षपदी अरुण पाटील आणि पोयंजे गाव कमिटी उपाध्यक्षपदी अशोक भोईर यांची नियुक्ती झाल्याबद्दल जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सोबत इतर पदाधिकारी व कार्यकर्ते.**

## कळंबोलीत गडकिल्ले प्रतिकृती स्पर्धा विजेत्यांचा सन्मान

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

२१ व्या शतकात मोबाईलच्या जमान्यात बच्चे कंपनींनी दिवाळीच्या सुट्टीत गड किल्ल्यांच्या प्रतिकृती तयार करून शिवरायांचा इतिहास बालवयातच बालमनावर रुजवण्यात यावा व शिवरायांच हिंदवी स्वराज्याचे झुंजार लढाऊ बाणा बालमनात तेजत राहावा या हेतूने कळंबोलीतील शिवसेना शिंदे गटाचे पनवेल विधानसभा प्रमुख नितीन काळे यांनी गड किल्ले प्रतिकृती तयार करण्याच्या



स्पर्धा आयोजित केली होती.

या स्पर्धेत कळंबोलीतील बालकलाकार मंडळांनी स्फुर्तपणे सहभाग घेतला. उत्कृष्ट गड किल्ले बनवणाऱ्यांना पारितोषिक देऊन तसेच सहभागी होणाऱ्या बालकलाकारांना सन्मानपूर्वक सहभागी प्रमाणपत्र व शिवरायांचे सन्मानचिन्ह गड किल्ले प्रतिकृती जवळ जाऊन वितरित करण्यात आले. यावेळी बाल कलाकारांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत असल्याचे दिसून आले. जय भवानी जय शिवाजीच्या नारा यावेळी बाल कालाकारांनी उत्स्फूर्तपणे दिला.

या स्पर्धेला कळंबोलीतून चांगला प्रतिसादही मिळाला. दिवाळीच्या सुट्टीत मोबाईलच्या ऐवजी बच्चे कंपनीने हात चिखलामध्ये रुजवण्यात व त्यातच तल्लीन होऊन गड किल्ल्यांच्या प्रतिकृती तयार करण्यात घालवला. यामुळे विद्यार्थ्यांची मातीची नाळ अधिक घट्ट झाली. या स्पर्धेत सहभागी मंडळांत शिव किल्ला मित्र मंडळ,ई वन स्टार मित्र मंडळ. सिद्धिविनायक मित्र मंडळ श्री गणेश कृपा असोशिएन. सहयोग मित्र मंडळ. श्री सिद्धिविनायक मंडळ .सर्व सहभागी विजेते मंडळ यांना सन्मानपत्र व शिवरायांची प्रतिकृती देऊन गौरवण्यात आले

## निवडक

### मोबाईल, लॅपटॉपची चोरी

**करंजाडे :** अनोळखी चोरट्याने घरात प्रवेश करून दोन मोबाईल आणि लॅपटॉप चोरून नेले. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. केदार चौधरी हे करंजाडे, सेक्टर दोन येथे राहत असून सकाळी ते दिवाळी पहाट कार्यक्रम पाहून घरी आले आणि घरातील साफसफाई करत असताना लॅपटॉप आणि दोन मोबाईल टीपॉय वर ठेवले होते. त्यावेळी दरवाजा उघडा होता. ते किचनमध्ये गेले असताना अनोळखी इसम हॉलच्या दरवाज्यातून पळून जाताना दिसला. त्यावेळी लॅपटॉप आणि दोन मोबाईल फोन दिसून आले नाहीत.

### इसमाचा मृत्यू

**पनवेल :** एका इसमाचा मृत्यू झाल्याने त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. महेंद्रप्रसाद रामस्वरुप अवस्थी (६३ रा.मालधक्का रोड पनवेल) उंची ५ फुट २ इंच, बांधा मध्यम, रंग सावळा, चेहरा उभट, नाक सरळ, केस काळे पांढरे-बारीक, दाढी मिशी काळी पांढरी वाढलेली आहे. या इसमाच्या नातेवाईकांबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा स.पो.नि.प्रज्ञा मुंढे मो.नं.७६६६११४८७४ यांच्याशी संपर्क साधावा.

### तरुण बेपत्ता

**पनवेल :** मित्राबरोबर फेरफटका मारुन येतो असे सांगून घराबाहेर पडलेला एक तरुण अद्याप घरी न परतल्याने तो हरविल्याची तक्रार उलवा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. सुधीर शशिकांत मिसले (२६ रा.उलवे) उंची ५ फुट २ इंच, रंग गोरा, बांधा मध्यम, चेहरा उभट, नाक सरळ, केस काळे, दाढी मिशी बारीक असून अंगात लाल रंगाचा हाफ बाह्याचा टी-शर्ट व राखाडी रंगाची ट्रॅक पॅन्ट तसेच पायात हिरव्या रंगाची चप्पल आहे. त्याला हिंदी व मराठी भाषा अवगत आहे. या तरुणाबाबत माहिती असल्यास उलवा पोलीस ठाणे यांच्याशी संपर्क साधावा.

## पुण्यश्लोक नाटकाचा आज पनवेलमध्ये प्रयोग

**पनवेल :** लोकमाता अहिल्याबाई होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त सोमवार दिनांक २७ ऑक्टोबर रोजी पनवेल येथे पुण्यश्लोक या नाटकाचे आयोजन आद्य क्रांतिवीर वासुदेव फडके नाट्यगृहात करण्यात आले आहे. पंत ड्रामा फोरम मुंबई, सहज कलाकृती फाउंडेशन मुंबई यांच्या वतीने आणि भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या सहकार्याने हे नाटक आयोजित केले आहे. एन के पंत यांनी दिग्दर्शन केले असून अरुण शेखर हे नाटकाचे लेखक आणि क्रिएटिव्ह डायरेक्टर आहेत. भाजप प्रदेश महासचिव आणि राजमाता अहिल्याबाई होळकर सेवा समितीचे अध्यक्ष आमदार विक्रांत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत या नाट्यकृतीचे उद्घाटन होणार असून यावेळी माझे सभागृह नेते परेश ठाकूर महानगरपालिकेचे माजी सभापती विकास घरत, व्यापारी संघ कामोठेचे अध्यक्ष श्री नानासाहेब हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून अहिल्याबाई होळकर यांची शौर्यगाथा समजून घेण्याकरिता रसिकांनी रात्री ८ वाजता उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.



**पनवेल : लक्ष्मी वसाहत झोपडपट्टीमध्ये सिलिंडरला आग लागली होती. ही माहिती मिळताच माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी महापालिका अग्निशमन दलाला कळविले. अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी तेथे येऊन आग विझवली. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. या वेळी राजू कोळी, हसन बागवान, रोशन जाधव, चंद्रकांत जगे व इतर उपस्थित होते.**

## भाजप युवा मोर्चा पदाधिकारी अनिमेष ओझे यांच्या सतर्कतेमुळे वाचला जीव

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल भाजप युवा मोर्चा पदाधिकारी अनिमेष अमित ओझे यांच्या सतर्कतेमुळे एका जखमी इसमाचा जीव बचावला आहे.

शहरातील वडाळे तलाव परिसरात आर्थिक देवाण घेवाणाच्या वादातून दोघा इसमांमध्ये जोरदार वादविवाद झाले. या वेळी एकाने त्याच्याकडे असलेल्या धारदार चाकूने दुसऱ्या व्यक्तीस जखमी करून तो पळून गेला होता. त्याच काळामध्ये त्या परिसरातून भारतीय जनता युवा मोर्चा पदाधिकारी अनिमेष ओझे तेथून जात असताना घटनेचे गांभीर्य ओळखून त्यानी चाकूहल्ल्याने जखमी झालेल्या इसमास आपल्या गाडीने तातडीने लाईफ लाईन हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले व याबाबतची माहिती पोलिसांना दिली. त्यांच्या तत्परतेमुळे जखमी रुग्णाला त्वरित उपचार मिळाल्याने जखमी व्यक्तीच्या नातेवाईकांनी अनिमेष ओझे याचे आभार मानले आहेत.

## थुंकण्याच्या कारणावरून हेल्मेटने मारहाण

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

थुंकण्याचे कारण विचारले असता चौघांनी धक्काबुक्की करून हेल्मेटने २३ वर्षीय तरुणाला मारहाण केली. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

विक्रांत ठाकूर हा रिस गाव, रसायनी येथे राहत असून तो २३ ऑक्टोबर रोजी रात्री नऊच्या सुमारास मित्र अभिनव जाधव यांच्यासोबत मोटरसायकलने ओएनजीसी सिग्नल, पनवेल येथे आला. यावेळी इनोवा कार क्रमांक एम एच ४६ बीके २६९७ यातील इसम गाडी बाहेर थुंकला आणि ते विक्रांत त्याच्या अंगावर उडले. यावेळी दोघांनीही गाडी बाजूला घेतली. त्यानंतर चार इसम कारमधून उतरले आणि विक्रांत जवळ आले. विक्रांतने त्यांना थुंकण्याचे कारण विचारले असता त्यांच्यात धक्काबुक्की झाली. यावेळी एकाने हेल्मेट घेऊन विक्रांतला मारहाण केली. त्यांच्या कारचा फोटो काढला असता एकाने तो फोटो डिलीट कर नाहीतर चावी देणार नाही असे बोलला. त्यानंतर ते तिथून निघून गेले.

## कळंबोलीत लोखंडी रॉडने मारहाण, गुन्हा दाखल

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

मद्य पिण्याची परवानगी कोणी दिली असे विचारून हाताने आणि लोखंडी रॉडने मारहाण केल्याप्रकरणी करण नाईक (कळंबोली) व अनोळखी इसम याच्या विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

कृष्णकांत कंठाळे हे सेक्टर चार, कळंबोली येथे राहत असून तो आणि त्याचा मित्र अमन यादव हा मॅकडोनाल्ड शेजारील गॅरेजच्या जवळ खुर्चीवर मद्य पीण्यासाठी बसले होते. यावेळी करण नाईक आणि एक अनोळखी इसम त्या ठिकाणी आला आणि तुम्ही इथे मदय प्यायला कसे बसला, तुम्हाला इथे बसण्याची परवानगी कोणी दिली असे बोलून शिवीगाळ आणि मारहाण केली.

## अज्ञात इसमाने महिलेचा गळा दाबून खून करून दागिने केले लंपास

**पनवेल : वार्ताहर**

अज्ञात इसमाने एका महिलेचा गळा दाबून खुन करून तिचे दागिने लंपास केल्याची घटना पनवेल तालुक्यातील कुंडेवहाळ गावात घडली आहे.

संगीता नामदेव म्हात्रे (५५ रा.कुंडेवहाळ) असे या मयत महिलेचे नाव असून त्या आपल्या घरी असताना कोणीतरी अज्ञात इसमाने चोरी करण्याच्या उद्देशाने त्यांचा गळा दाबून खून केला व घरातील सोन्याची चेन, सोन्याचे मंगळसूत्र, सोन्याच्या अंगठ्या, सोन्यातील कानातले असा मिळून जवळपास १ लाख ५५ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरुन नेला आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच पोलिसांची वेगवेगळी पथके आरोपींच्या शोधात रवाना झाली आहेत. व काही संशयितांना ताब्यात घेण्यात आले आहे.

## संपादकीय

# जारे जारे पावसा...

मे महिन्यापासून सुरू झालेला पाऊस ऑक्टोबर संपायला आला तरी जायचे काही नाव घेत नाहीए. जवळपास सहा महिने तो बरसत असल्याने शेतकऱ्यांसह सारेच त्रस्त असून आता जारे जारे पावसा... असे म्हणत आहेत, कारण बदल्यात हवामानाने सगळ्या घटकांवर परिणाम केला आहे.

**मे महिन्याच्या उत्तरार्धात सुरू झालेला पावसाळा यंदा महाराष्ट्रात अक्षरशः कहर ठरला आहे. सामान्यतः पावसाळा चार महिन्यांचा असतो, पण या वर्षी त्याचे चक्र सहा महिन्यांहून अधिक लांबले आहे. जून ते सप्टेंबर एवढाच कालावधी नव्हे; तर ऑक्टोबरअखेरही आकाश काळ्या ढगांनी भरलेले दिसते आहे. शेतकऱ्यांसाठी हा पाऊस वरदानाऐवजी अभिशाप ठरला असून खरीप हंगामाचे मोठे नुकसान झाले आहे. त्याचे गंभीर परिणाम केवळ हवामानापुरते मर्यादित न राहता ग्रामीण अर्थव्यवस्थेवर, शेतीवर आणि शेतकऱ्यांच्या उपजीविकेवर होत आहेत. दरवर्षी मे अखेरीस शेतकरी नव्या हंगामाची तयारी करतो. बियाण्यांची खरेदी, नांगरणी, पेरणी या साऱ्या प्रक्रियेत त्याचे संपूर्ण आयुष्य गुंतलेले असते. या वर्षीही तशीच तयारी झाली. सुरुवातीचा पाऊस काहीसा अनियमित असला तरी नंतर तो स्थिरावला. शेतकऱ्यांना वाटले यंदा हंगाम चांगला जाईल, पण निसर्गाने मध्यंतरीच पलटी घेतली. जुलैपासून सप्टेंबरपर्यंत काही भागांत पावसाचा जोर इतका वाढला की पिके पाण्यात बुडाली. आधी राज्यातील मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, खानदेश आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांत पूरस्थिती निर्माण झाली. घरे-दारे, जनावरे, रस्ते, पूल यांचेही नुकसान झाले. अनेक ठिकाणी विजेचे आणि पाण्याचे पुरवठे खंडित झाले. या सर्व परिस्थितीमुळे ग्रामीण भागातील अर्थचक्र पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. शेतकऱ्यांसोबतच व्यापारी, मजूर आणि छोट्या उद्योगांनाही फटका बसला आहे. खरीप हंगाम हा शेतकऱ्यांच्या वर्षभरातील आशेचा किरण असतो, मात्र सातत्याने पडणाऱ्या पावसामुळे हा हंगाम अक्षरशः वाहून गेला. भात, सोयाबीन, मका, कापूस, तूर, मूग, उडीद यासारख्या पिकांना मोठा फटका बसला आहे. काही ठिकाणी पिके पाण्यात बुडाली, तर काही ठिकाणी काढणीच्या वेळेला झालेल्या सततच्या पावसामुळे धान्याचे दाणे काळे पडले, सडले. शेतकऱ्यांच्या महिन्यांच्या कष्टावर पाणी फिरले आहे. या सगळ्या परिस्थितीचा एक खोल संदेशही आहे तो म्हणजे हवामान बदल आता वास्तव बनला आहे. ऋतूंचे चक्र विस्कळीत झाले आहे. कधी अतिवृष्टी, कधी दुष्काळ, तर कधी अनियमित पावसाचा फटका बसतो. या सगळ्या स्थितीमागे एक मोठे कारण आहे हवामान बदल. जगभरात तापमानवाढ, ध्रुवीय बर्फाचे वितळणे, समुद्राची पातळी वाढणे, हे सर्व परिणाम आता भारतातही स्पष्ट दिसू लागले आहेत. यावर दीर्घकालीन उपाय म्हणून जलसंधारण, जलव्यवस्थापन, टिकाऊ शेती पद्धती आणि हवामानसुसंगत पीक पद्धती अवलंबणे ही काळाची गरज आहे. पावसाच्या या कहराने शेतकऱ्यांचे मनोबल ढासळले असले, तरी केंद्र आणि राज्य शासन वेळोवेळी मदत करीत आहे. शेतकऱ्यांच्या या संकटात समाजानेही हातभार लावायला हवा. स्वयंसेवी संस्था, युवक मंडळे, सहकारी संस्था यांनी शेतकऱ्यांना मदत सामग्री, अन्नधान्य, औषधे आणि जनावरांसाठी चारा उपलब्ध करून द्यावा. शेती हा केवळ शेतकऱ्यांचा व्यवसाय नाही, तर देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यामुळे शेतकरी सशक्त राहिला, तर देशही सशक्त राहील.**

# मोकाट गुरे आणि भटक्या कुत्र्यांना आवरा...





**खबरबात**
विजय मांडे

भाऊबीजेच्या दिवशी एका पिसाळलेल्या बैलाने हल्ला केल्याने मॉर्निंग वॉकला निघालेल्या एका ७० वर्षीय वृद्धाचा नाहक बळी गेला तसेच या बैलाने आणखी पाच जणांना जखमी केले आणि वाहनांना धडका मारून त्या नादुरुस्त केल्या. यापूर्वी भटक्या कुत्र्यांनी हैदोस घातला होता, तर माकडांनीही कर्जतकरांना सळो की पळो करून सोडले होते. या घटनांचा विचार करता या सर्व गोष्टींवर नियंत्रण कोण ठेवणार? घटना घडली की तेव्हढ्यापुरता त्याची चर्चा होते. त्यानंतर पुन्हा घटना घडेपर्यंत कुणीच काही बोलत नाही.

गेल्या काही दिवसांमध्ये भटक्या कुत्र्यांनी नागरिकांना त्रास दिला होता. काहींच्या चावे घेतले तर काहींच्या वाहनांच्या विशेषतः दुचाकींच्या मध्ये आलेल्या अपघातामध्ये अनेक जण गंभीर जखमी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. अजूनही त्यावर नियंत्रण नाही. अन्य नगर परिषद क्षेत्रातील कुत्रे कर्जतच्या चार फाट्यावर किंवा कर्जत नगर परिषदेच्या हद्दीत आणून सोडण्याच्या घटना घडत असतात, मात्र तसे करताना त्यांना कुणीही अडवत नाही. त्यामुळे या घटना सातत्याने सुरू असतात.

मध्यंतरी कुत्र्याचे निर्बीजीकरण करण्यासाठी काही संस्था कर्जतमध्ये आल्या होत्या, मात्र त्यांनाही फारसे काही जमले नाही, कारण कुत्र्यांची पिल्ले नेहमीच जागोजागी दृष्टीस पडतात. काही ठिकाणी पिसाळलेले कुत्रे चावण्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे काही संस्थानी या भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी नगर परिषदेकडे निवेदन देऊन केली आहे. या भटक्या कुत्र्यांमुळेच परवा भाऊबीजेला घडलेली घटना घडली असावी असा अंदाज अनेकांनी वर्तविला आहे. एखादे पिसाळलेले कुत्रे त्या बैलाला चावले असावे. त्यामुळे काही दिवसांनी हा बैल पिसाळला असावा. किंवा जनावरांची तस्करी करणारे जनावरांना भुलीचे इंजेक्शन देतात. ते या बैलाला दिले असावे आणि म्हणून तो पिसाळला असावा अशीही उघडपणे चर्चा आहे. कर्जतमधील एक अभ्यासू वकील हृषिकेश जोशी यांनी या घटनेची सखोल चौकशी करावी, अशी मागणी केली आहे. तसे झाल्यास खरे कारण समोर येईल.

हल्ली शेती करण्याकडे कल कमी झाला आहे. त्यामुळे जनावरे पाळणे दूर राहिले आहे. जे प्रगतशील शेती करतात ते आता बैल किंवा रेडे पाळण्यापेक्षा ट्रॅक्टर किंवा पॉवर टिलरसारखी यंत्रे वापरतात. त्यामुळे जनावरांना पाळण्याचा प्रश्नच येत नाही. मग ही मोकाट जनावरे कुणाची? शहरात म्हशिंचे तबेले आहेत. त्यांना जागेवरच सर्व काही पुरवले जाते. काही जण पाण्यावर म्हशी नेत असतात, मात्र त्यांच्या मागे कायम गुराखी असतो. काही गावांत शर्यतीसाठी बैल पाळतात, पण त्यांना मोकळे सोडत नाहीत. त्यामुळे ही मोकाट गुरे कुठून येतात? कुणाची आहेत? हा प्रश्न निरुत्तर आहे.

ताज्या घटनेमुळे त्या बैलाचा मालक पुढे येणार नाही. या घटना रोखयच्या असतील तर नगर परिषदेने त्यात लक्ष घातले पाहिजे. पूर्वी ग्रामपंचायत आणि त्यानंतर नगर परिषदेचा कोंडवाडा होता. अर्थात, त्यावेळी जनावरांची संख्या जास्त होती. मुद्रे, दहिवली, भिसेगाव, गुंडगे, आकुर्ले या गावांमध्ये गुरे होती. कर्जत शहरातसुद्धा काहींच्या कडे गुरे होती. त्यावेळी या कोंडवाड्याचा उपयोग होत असे. आता उपयोग नाही म्हणून कोंडवाडासुद्धा राहिला नाही. त्यामुळे मोकाट गुरे शहरात आली तर त्यांना पकडून कुठे बंदिस्त करायचे हा प्रश्नच आहे.


मध्यंतरी माकडांनीही कर्जतकरांची झोप उडविली होती, मात्र वनखात्याच्या कर्मचाऱ्यांनी त्यांचा बंदोबस्त केल्याने माकडांचा त्रास वाचला.

खरेतर मोकाट गुरे व भेटके कुत्रे यांना आवर घालणे जरुरीचे आहे. नगर परिषद कार्यालय ते कर्जत-मुरबाड राज्य मार्ग या रस्त्यांवर अनेक शाळा आहेत. दिवाणी न्यायलाय आहे. या रस्त्यावर एखादे पिसाळलेले कुत्रे किंवा पिसाळलेले जनावर आले, तर शाळेत जाणाऱ्या-येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या व त्यांना शाळेत घेऊन येणाऱ्या पालकांच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित होतो. नगर परिषदेने यावर काहीतरी ठोस उपाय करावा, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

# प्रसिद्ध गायिका अनुराधा पौडवाल

प्रसिद्ध गायिका अनुराधा पौडवाल यांनी चित्रपटसृष्टीला एकापेक्षा एक हिट गाणी दिली आहेत. अनुराधा पौडवाल यांचा जन्म २७ ऑक्टोबर १९५२ रोजी झाला. अनुराधा पौडवाल संगीतविश्वातील एक मोठे नाव आहे. गेल्या अनेक दिवसांपासून त्या चित्रपटातील गाण्यापासून दूर आहे. आपल्या गोड आवाजाने चाहत्यांच्या हृदयात स्थान निर्माण करणाऱ्या अनुराधा पौडवाल यांच्याशी संबंधित काही खास गोष्टी आज आम्ही तुम्हाला सांगणार आहोत.

अनुराधा पौडवाल यांचे बालपण मुंबईत गेले. सुरुवातीपासूनच त्यांचा चित्रपट आणि संगीताकडे कल होता. अनुराधा पौडवाल यांनी १९७३ मध्ये आलेल्या 'अभिमान' या चित्रपटातून हिंदी चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. या चित्रपटात अमिताभ बच्चन आणि जया भादुरी यांच्या प्रमुख भूमिका होत्या. या चित्रपटात



अनुराधा पौडवाल यांनी जया बच्चन यांच्यासाठी एक श्लोक गीत गायले होते. यानंतर अनुराधा पौडवाल यांनी १९७६ मध्ये 'कालीचरण' या चित्रपटात गाणे गायले. 'आप बीती' या चित्रपटातून त्यांनी एकल गाण्यास सुरुवात केली. चित्रपटाचे संगीत लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांनी दिले होते. चित्रपटांमध्ये गाण्यासोबतच त्या स्टेज शोही करत असत. किशोर कुमार यांच्यासोबत त्यांनी जवळपास ३०० स्टेज शो केले.

अनुराधा पौडवाल यांनी अरुण पौडवाल यांच्याशी लग्न केले जे स्वतः संगीतकार होते. अरुण पौडवाल यांच्या अकाली निधनाने त्या खूप दु:खी झाल्या होत्या. टी-सीरिजच्या सहकार्याने त्या फक्त एक-दोन गाणी गात राहिल्या. अनुराधा पौडवाल यांना आदित्य आणि कविता ही दोन मुले होत. आदित्यचा मूत्रपिंड निकामी झाल्यामुळे मृत्यू झाला.

अनुराधा यांनी मधुर आवाजात अनेक हिट चित्रपट दिले. संगीत क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची दखल घेऊन त्यांना २०१७मध्ये पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. (साभार : इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# बनावट आयफोन कसा ओळखावा?

तुम्ही आयफोन खरेदी करण्याचा विचार करत असाल तर त्यापूर्वी सावधगिरी बाळगली पाहिजे. तसेच बनावट डिव्हाइसेस बाजारात असल्यानं तुमचं आर्थिक नुकसान होऊ शकतं. बनावट आयफोन ओळखण्यासाठी पॅकेजिंग, सीरियल नंबर, आयएमईआय नंबर, बिल्ड क्वालिटी, सॉफ्टवेअर आणि आय ओ एस एडिशन तपासा. यासह आम्ही काही ट्रिक्स सांगणार आहोत, त्या जाणून घेऊया.




बाजारात अनेक नकली किंवा बनावट आयफोन उपलब्ध आहे. आयफोन खरेदी करण्याचा विचार करत असाल तर त्यापूर्वी ही बातमी नक्की वाचा, कारण आयफोन खरेदी करताना सावधगिरी बाळगली पाहिजे तसेच बनावट डिव्हाइसेस बाजारात असल्यानं तुमचं आर्थिक नुकसान होऊ शकतं.

ॲपलचे हे फ्लॅगशिप डिव्हाईस केवळ उत्तम फीचर्स आणि स्पेसिफिकेशन्ससाठीच प्रसिद्ध नाहीत, तर अनेकांसाठी स्टेटस सिम्बॉलदेखील आहेत. २०२४ च्या तिसऱ्या तिमाहीत ॲपलने आयफोन विक्रीतून सुमारे ३९ अब्ज अमेरिकन डॉलर्सचे उत्पन्न मिळविले, मात्र आयफोनच्या वाढत्या मागणीमुळे बनावट डिव्हाईसची समस्याही वाढली आहे.

सणासुदीचा हंगाम असला की बाजारात सवलत असते. याच काळात आयफोन घेण्याचा लोक प्लॅन आखतात. दुरुस्तीदरम्यान बनावट आयफोन खरेदी किंवा वास्तविक आयफोनच्या बदल्यात बनावट डिव्हाईस देण्याचे प्रमाण वाढू शकते. आपण नवीन आयफोन खरेदी करण्याचा विचार करीत असल्यास किंवा तुमच्या डिव्हाईस खरा आहे की खोटा, हे तपासण्यासाठी खालील पद्धतींचा अवलंब करा.

पॅकेजिंग आणि ॲक्सेसरीजकडे लक्ष द्या ॲपलचे पॅकेजिंग उच्च दर्जाचे आहे. अस्सल आयफोनवरील बॉक्स मजबूत असतो आणि मजकूर छपाई नीटनेटकी असते. चार्जिंग केबलसारख्या ॲक्सेसरीज ॲपलच्या मानकांची पूर्तता करणे आवश्यक आहे. छपाई सदोष असल्यास, बॉक्स सैल दिसत असल्यास किंवा ॲक्सेसरीज जुळत नसल्यास सावधगिरी बाळगा. बिल्ड क्वालिटी आणि डिझाईन तपासा गुणवत्ता मजबूत आहे. याची बटणे, स्क्रीन, वजन आणि डिझाईन ॲपलच्या मानकांनुसार आहे. बनावट डिव्हाईसमध्ये अनेकदा लोगो चुकीच्या ठिकाणी असतो, कडा रुक्ष असतात किंवा बटणे सैल असतात. सेल्फ हेल्प टिप्स व्यतिरिक्त ॲपलच्या डीलरशिपवर जाऊन तुम्ही तुमचा फोन खरा की बनावट याची माहिती मिळवू शकता.

# कवी भास्कर रामचंद्र तथा भा.रा. तांबे



**निमित्त**

भास्कर रामचंद्र तांबे हे प्रसिद्ध मराठी कवी होते. त्यांचा जन्म २७ ऑक्टोबर १८७३ रोजी मध्य भारतात मुंगावली (मुगावली) येथे झाला. शिक्षण झांशी आणि देवास येथे झाले. १८९३ मध्ये प्रवेशपरीक्षा पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले परंतु आर्थिक प्रतिकूलतेमुळे उच्च शिक्षण घेता आले नाही. मध्य भारतातच अनेक वेगवेगळ्या ठिकाणी युवराजशिक्षक, दिवाण, पोलिस-सुपरिंटेंडंट, सरकारी वकील, न्यायाधीश, शिक्षणखात्यात परीक्षा विभागाचे रजिस्ट्रार इ. नोकऱ्यांमध्ये जीवन व्यतीत झाले. १९३७ मध्ये ग्वाल्हेर संस्थानाचे राजकवी झाले.

काव्यास विशेष अनुकूल नसणाऱ्या व्यवसायांतही तांब्यांचा काव्यलेखनाचा छंद कायम राहिला. इंग्रजी स्वच्छंदतावादी संप्रदायाचे कवी, टेनिसन-ब्राउनिंग हे पुढील कवी, जयदेव हा संस्कृत कवी तसेच रवींद्रनाथ टागोर यांच्या काव्याचे संस्कार त्यांच्यावर वेळोवेळी होत गेलेपरंतु त्यांच्या कवितेचे मुख्य स्वरूप गीतांचे, भावगीतांचे राहिले. ब्राउनिंगच्या नाट्यात्मक एकभाषितांप्रमाणे त्यांनी मराठीमध्ये प्राचुर्याने नाट्यगीते लिहिली.


त्यांच्या गीतपद्धतीची छाप रविकिरणमंडळातील कवी आणि बोरकर, कुसुमाग्रजादी पुढील कवींवरही पडली. केशवसुतादी अर्वाचीन कवितेच्या प्रणेत्यांहून स्वतंत्र राहूनच तांबे यांनी आपली स्वच्छंदतावादी कविता लिहिली. संदेश देण्याचा अभिनिवेश त्यांनी बाळगला नाही. स्वतःचे प्रेमसंतृप्त जीवन आणि इतरांच्या प्रेमाबद्दलची आस्था ह्यांतून त्यांची बहुतेक नाट्यगीते निर्माण झाली आहेत. परमेश्वरावर त्यांची दृढ श्रद्धा होती. त्यांतून काही 'अनुभवा'ची कविता त्यांच्याकडून लिहिली गेली परंतु आध्यात्मिकतेचे स्तोम त्यांनी माजविले नाही. सुनीतरचनेमध्ये केशवसुतांना त्यांनी साथ दिली तथापि तीमध्ये त्यांचे मन विशेष रमले नाही. एक सौंदर्यवादी आणि स्वतंत्र प्रतिभेचा कवी म्हणून त्यांचे अर्वाचीन कवींमधील स्थान फार वरचे आहे. त्यांनी रूढ केलेला गीतसंप्रदाय हा तांबेसंप्रदाय म्हणूनही ओळखला जातो.

त्यांची कविता प्रथम संग्रहरूपाने १९२० मध्ये रसिकांपुढे आली, नंतर दुसरा भाग १९२७ साली आणि समग्र कविता १९३५ साली प्रकाशित झाली. तीत एकुण २२५ कविता आहेतकाही हिंदी कवितांचाही त्यात अंतर्भाव आहे. तीनही संग्रहांस अनुक्रमे मायदेव, अज्ञातवासी आणि माधव जूलियन हे कवीच संपादक लाभले. स्वतः तांबे हे मात्र आपल्या कवितेच्या प्रसिद्धीबाबत बेफिकीर असत. तांबे ह्यांना संगीताचे चांगले ज्ञान होते व त्यांच्या अनेक कवितांवर, त्या कोणत्यारागांत गायिल्या जाव्यात, ह्यासंबंधीच्या सूचना त्यांनी देऊन ठेवलेल्या आहेत. तांब्यांचे काव्यविषयीचे गद्यलेखनही लक्षणीय आहे.

१९२६ मध्ये भरलेल्या मध्यभारतीय कविसंमेलनाचे ते अध्यक्ष होते. १९३२ मध्ये कोल्हापूर येथे भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनांतर्गत कविसंमेलनाचे ते अध्यक्ष होते. ग्वाल्हेर येथे ते ७ डिसेंबर १९४१ रोजी निधन पावले.

**(साभार : विश्वकोषमराठी)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# शाकाहारी लोकांना हृदयरोगाचा धोका कमी

प्रत्येकाला आपले शारीरिक आरोग्य हे चांगले राहण्यासाठी आहारात पौष्टिक पदार्थांचा समावेश करत असतो. जर आपण आपल्या आहारात जास्त शाकाहारी पदार्थ आणि कमी मांसाहारी खाल्ले, तर आपण हृदयरोगाचा धोका कमी करू शकता हे एका संशोधनात सिद्ध झाले आहे.



दरम्यान, इंग्लंड आणि स्कॉटलंडमध्ये झालेल्या संशोधनात असे दिसून आले आहे की मांसाहारी आहार घेणाऱ्या लोकांपेक्षा शाकाहारी आहार घेणाऱ्या लोकांमध्ये हृदयविकाराने मृत्यूचा धोका हा ३२ टक्के कमी झालेला आहे, कारण शाकाहारी जेवणातील फायबर आणि मिनरल्स हृदयाच्या आरोग्यासाठी चांगले पोषण देत असते असे दिसून आले आहे, तर मांसाहारी पदार्थांच्या तुलनेत शाकाहारी आहाराच्या सेवनाने कोलेस्टेरॉलची पातळी नियंत्रित राहते. यामुळे हृदयविकाराचा धोकाही कमी होतो.

तुम्ही जर शाकाहारी आहार घेत असाल तर ते तुमच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे, कारण शाकाहारी जेवणात सॅच्युरेटेड फॅटही कमी असल्याचे संशोधनातून समोर आले आहे, ज्यामुळे हृदयरोगाचा धोका कमी होतो. शाकाहारी आहारात ॲंटिऑक्सिडंट्सचे प्रमाण जास्त असल्याने हृदयविकारांपासूनही बचाव होतो.

इंग्लंड आणि स्कॉटलंडमधील सुमारे ४५ हजार लोकांच्या खाण्या-पिण्याच्या सवयींवर आधारित वर्षभराच्या संशोधनानंतर असा दावा करण्यात आला आहे की मांसाहारी आहारापेक्षा शाकाहारी आहार हृदयाच्या आरोग्यासाठी अधिक फायदेशीर आहे.

अमेरिकन हार्ट असोसिएशनचे यांच्या म्हणण्यानुसारसुद्धा तुम्ही पूर्णपणे शाकाहारी आहार घेतल्यास मांसाहार या आहाराच्या तुलनेत हृदयविकाराचा झटका आणि हृदयरोगाचा धोका कमी होतो तसेच आहारतज्ज्ञ डॉ. अलका अग्रवाल सांगतात की, शाकाहारी आहारामुळे रक्तदाब नियंत्रणात राहतो. त्यामुळे हृदयरोगाचा धोका कमी होतो. शाकाहारी आहारामुळे हृदयाचे स्नायू मजबूत राहतात. यामुळे तीव्र जळजळ कमी होते आणि हृदयरोगांपासून बचाव होतो.

# नागोठणे रामनगर रहिवासी धुरळ्याने त्रस्त

## रखडलेल्या कामामुळे आरोग्याची हानी; आंदोलनाचा इशारा

**नागोठणे : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्ग रुंदीकरणाचे काम गेले अनेक वर्षांपासून चालू आहे. कधी संपणार हे खात्रीशीरपणे संबंधित अधिकारीदेखील सांगू शकत नाहीत. या महामार्ग रुंदीकरण कामकाजाचा फटका अनेक नागरिकांना बसला आहे. या कामामुळे अनेक अपघात होऊन बऱ्याच जणांचा जीव देखील गेला आहे. तरी याबाबतीत पाहिजे तसे लक्ष दिले जात नाही.



महामार्ग रुंदीकरण कामकाजामुळे महामार्गवरून उडणाऱ्या धुराळामुळे नागोठणे रामनगर येथील ५० ते ६० घरातील रहिवासी त्रस्त झाले आहेत तसेच या धुराळ्या पासून होणाऱ्या आजाराने आरोग्याला हानी पोहचत आहे. रामनगर येथील रस्त्याचे लवकरात लवकर डांबरीकरण न केल्यास रस्ता रोको आंदोलन छेडाण्याचा इशारा भाजपचे नागोठणे शहर माजी अध्यक्ष तथा रामनगर उत्सव समिती अध्यक्ष शेखर गोळे यांच्या नेतृत्वाखाली किसन पानकर, संतोष खरात, नवल तायडे, गणेश मोरे, शुभम गुप्ता, कस्तुरी धोत्रे, सोमेश्वर सोनी, मारुती पोटफोडे आदी ग्रामस्थांनी दिला आहे.

मुंबई गोवा महामार्गाच्या कामकाजासाठी गेल्या ७ ते ८ महिन्यांपासून रामनगर वस्ती समोर मोठ मोठे खड्डे खोदलेले आहेत. त्यामुळे जो सर्व्हिस रोड आहे त्या रोड वरून गोवाकडे जाणारे सर्व वाहने जात असतात तसेच हा सर्व्हिस रोड पूर्णतः खराब झालेला आहे त्यामुळे प्रचंड प्रमाणात धुरळा उडतो आणि हा धुरळा रस्त्यालागत असलेल्या ५० ते ६० घरांमध्ये जातो. या घरातील लहान मुले,बाई माणसे, वृद्ध नागरिक यांना खोकला, सर्दी असे आजार होत आहेत. तसेच जेवणात देखील धुरळा जातो त्यामुळे घरातील सर्व लोकांच्या आरोग्यावर मोठा परिणाम झालेला आहे. तसेच रामनगर बाजूने खडकआळी कडे जाण्यासाठी जो रस्ता आहे त्यामध्ये गतिरोधक देखील नाही त्यामुळे येणारे जाणारे विध्यार्थी, ग्रामस्थ यांचा अपघात होण्याची शक्यता आहे. काही महिन्यांपूर्वी वणी येथील एक तरुण अजय मांडलूसकर यांचा या रस्त्यावर अपघात होऊन मृत्यू झाला होता.

याबाबतीत संबंधित यंत्रणा काहीही लक्ष देण्यास तयार नाही. रामनगर येथील साईबाबा मंदिर ते एस. बी. आय. बँके पर्यंतचा रस्त्याचे लवकरात लवकर डांबरीकरण न केल्यास रस्ता रोको आंदोलन छेडाण्याचा इशारा रामनगर ग्रामस्थांनी दिला आहे.

## मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील पुलावरून पडून एकाचा मृत्यू

**खोपोली :** बेपत्ता असलेले सुरेश कुमार शिवकुमार पारिख (वय ३५ रा. कळंबोली नवी मुंबई) खालापूर हद्दीत नदीपात्रत आढळून आला आहे. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरून प्रवास करणारे सुरेश कुमार खालापूर हद्दीत बेपत्ता झाले होते. मिळालेल्या माहितीनुसार सुरेश कुमार हरवल्याची दिनांक २१ ऑक्टोबर रोजी खालापूर पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. २४ ऑक्टोंबर रोजी सकाळी खालापूर हद्दीत पाताळगंगा नदीत त्याचा मृतदेह आढळून आला. मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर खालापूर हद्दीत पुलावरून नदीत पडल्याने सुरेश कुमार चा मृत्यू झाल्याची नोंद खालापूर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून सुरेश कुमारचे शवविच्छेदन खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात केल्यानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला आहे.



**खोपोली : खंडाळा घाट माथ्यावरील गारमाळ परिसरात रस्त्यावर रविवारी पहाटे गव्याचे नागरिकांना दर्शन झाले. हा गवा रुबाबदारपणे या जंगलात वावरतो आहे.**

## चोरढे गावात कुटुंबाला टाकले वाळीत; २३ जणांवर गुन्हा दाखल

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात सामाजिक बहिष्काराची प्रकार धांबण्याची चिन्ह दिसत नाही. काही दिवसांपूर्वी अलिबाग तालुक्यातील खैरवाडी येथे एका कुटूंबाला वाळीत टाकल्याचा प्रकार समोर आला होता. आता मुरुड तालुक्यातील चोरढे गावातील स्मारकाच्या जागेचा वादाचे प्रकरण न्यायालयात नेले म्हणून एका कुटूंबाला वाळीत टाकल्याची प्रकरण समोर आले आहे. या प्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात २३ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार चोरढे गावातील एका समाजातील ग्रामस्थांनी गावातील जुन्या हनुमान मंदिराच्या जागेत नवीन मंदिराचे बांधकाम केले. त्या मंदिरालगत असलेली छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाची जागा बदलून ते स्मारक मुख्य रस्त्यात वाहनांना अडथळा निर्माण होईल, अशा ठिकाणी बांधले. ही जागा बदलावी, यासाठी त्यांनी समाजाच्या पंचांबरोबरच शासनाकडे तक्रार केली होती. मात्र त्याची दखल घेतली गेली नाही. त्यामुळे तक्रारदार कुटूंबाने या बांधकामाविरोधात दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला. या गोष्टीचा राग धरून चोरढे गावातील समाजाचे पंच मंडळ आणि इतर २३ जणांनी गावातील हनुमान मंदिरात गावकाची सभा घेतली, आणि न्यायालयात दाद मागणाऱ्या कुटूंबाला वाळीत टाकले.

या कुटुंबाशी संबंध ठेवण्यास इतर ग्रामस्थांना मज्ञाव केला. संबध ठेवल्यास तीन हजार रुपयांचा दंड करण्याचा ठरावही घेतला. याबाबतची तक्रार प्राप्त झाल्यानंतर पोलिसांनी पंच कमिटी आणि इतर ग्रामस्थ अशा एकूण २३ जणांविरोधात सामाजिक अपात्रता प्रतिबंधक अधिनियम २०१६ तील विविध कलमा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक दिपक म्हाशीलकर पुढील तपास करत आहेत.

## मुरूड येथे पर्यटन महोत्सवाचे आयोजन करणार -खासदार तटकरे

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड हे पर्यटन स्थळ असून येथे विविध प्रेक्षणीय स्थळे पहाण्यासाठी वर्षाला सहा लाख पेक्षा जास्त पर्यटक येत असतात. साधारणता डिसेंबर महिन्याच्या अखेरच्या दिवसात मुरुड समुद्र किनारी तीन दिवसाचा हा पर्यटन महोत्सव साजरा होत असतो. नाताळ सुट्टीचा आनंद लुटण्यासाठी हजारोच्या संख्येने पर्यटक मुरुड येथे येत असतात. पर्यटक व स्थानिक नागरिक यांच्या इच्छेचा आदर करीत मुरुड येथील दरवर्षी होणारा पर्यटन महोत्सव मोठ्या थाटात साजरा केला जाईल याची यासाठी मी स्वतः सहभागी होणार असल्याचे प्रतिपादन खासदार सुनील तटकरे यांनी मुरुड येथे केले आहे.



मुरुड येथे एका पक्ष प्रवेश कार्यक्रमासाठी आले असताना ते पत्रकारांशी बोलत होते.यावेळी त्यांच्या समवेत मुरुड तालुका अध्यक्ष फैरोज घलटे,प्रमुख नेते मनोज भगत,माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर,माजी जिल्हा परिषद सदस्य सुबोध महाडिक, रायगड जिल्हा सोशल मिडिया सेलचे उपाध्यक्ष हसमुख जैन,माजी सरपंच अजित कासार,महिला तालुका अध्यक्ष ऍड.मृणाल खोत,मुरुड शहर अध्यक्ष संजय गुंजाळ,मुरुड शहर महिला अध्यक्ष शीतल घरत ,सचिव विजय पैर,माजी सभापती बाबू नागावकर,मुरुड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उपाध्यक्ष शाम कोतवाल आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी खासदार सुनील तटकरे यांनी सांगितले की, पर्यटन महोत्सवासाठी राज्य सरकार कडून विशेष अनुदान उपलब्ध करून पर्यटक यांना आकर्षक कार्यक्रम यावेळी सादर केले जातील. मुरुड येथे होणारा पर्यटन महोत्सव राज्यात सर्वत्र प्रसिद्ध असून या काळात मोठ्या संखेने पर्यटक येत असतात. लज्जतदार पदार्थ व विविध खाद्य संस्कृतीची रेलचेल या महोत्सवामधून होत असते.यंदाच्या वर्षापासून पर्यटन महोत्सव होणार असून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सर्व कार्यकर्ते यासाठी विशेष मेहनत घेतील असा विश्वास सुद्धा तटकरे यांनी व्यक्त केला.

मुरुड एसटी आगरामध्ये सी एन जी पंप कार्यान्वित कार्यान्वित होण्यासाठी मी आदेश दिले आहेत. यासाठी सी एन जी गॅस अथॉरिटीज चे तज्ञ अधिकारी वर्ग व एसटी महामंडळ अधिकारी वर्गाने संयुक्त भेट देऊन जागेची पाहणी करून यामधील काही अडचणीच्या ठरणाऱ्या चुका निदर्शनास आणून दिल्या आहेत. या सर्व समस्या दूर करून लवकरच सी एन जी पंप कार्यान्वित झालेले पहावयास मिळेल असा विश्वास खासदार तटकरे यांनी व्यक्त केला

## खोपोली नगरपालिकेची धूर फवारणी यंत्रणा ठप्प; नागरिकांचे आरोग्य रामभरोसे!

**खोपोली : प्रतिनिधी**

पावसाळी हंगाम संपत आला तरी ही एकदाही धुरफवारणी करण्यात आली नाही. ऑक्टोबर हिट त्यात अवकाळी परतीचा पावसाच्या पार्श्वभूमीवर खोपोली शहरात डासांचा मोठया प्रमाणावर प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळे शहरात मलेरिया व अन्य साथीचे आजार झालेल्यांची संख्या वाढली आहे . याची दखल घेत नगरपालिका आरोग्य यंत्रणा ऍक्टिव्ह होऊन धूर फवारणी करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.



मागील दोन वर्षांपूर्वी धूर फवारणीसाठी लाखोंचा निधी खर्च करून कार्यान्वित करण्यात आलेली संपूर्ण यंत्रणाच मोडीत निघाली आहे .डास निर्मुलन व त्यासाठीची धूर फवारणी यंत्रणा पूर्णपणे ठप्प असल्याने येथील नागरिकांचे आरोग्य रामभरोसे असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

वर्तमान स्थितीत वाढलेला डासांचा प्रादुर्भामुळे नागरिक त्रस्त आहेत . याची दखल घेत नियमितपणे धूर फवारणी व्हावी अशी मागणी करण्यात आली होती. तसेच विविध सामाजिक संस्था , सामाजिक कार्यकर्त्यांनी ही वारंवार धूर फवारणी, डास निर्मूलन, सार्वजनिक स्वच्छता बाबत नगरपालिका प्रशासन व संबंधित आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करूनही ठप्प पडलेली यंत्रणा ठप्पच आहे .वरिष्ठ अधिकाऱ्यांचे विभाग प्रमुख व विभाग प्रमुखांचे जबाबदार कर्मचारी व यंत्रणेवर कोणतेही नियंत्रण राहिले नसल्याचे वारंवार स्पष्ट होत असून , कर वसुलीसाठी आग्रही असलेले नगरपालिका प्रशासन मूलभूत सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यात मात्र निष्क्रिय ठरत असल्याने नागरिकांत कमालीची नाराजी व्यक्त केली जात आहे.

वर्तमान स्थितीत खोपोली शहरातील प्रत्येक कुटुंबाला डासांच्या निर्मूलनासाठी दर महिन्याला अतिरिक्त खर्च करावा लागत असल्याचे स्पष्ट होत आहे. दुसरीकडे अस्वच्छता व मच्छरांमुळे होत असलेले साथीचे आजारमुळे शहरातील नागरिक हैराण असून दवाखाना व उपचारासाठी अतिरिक्त खर्चाने नागरिक हैराण झाले आहेत.

## माजी उपसभापती शैलेश सलागरे यांचा शिवसेनेत प्रवेश

**पोलादपूर : प्रतिनिधी**

कापडे बुद्रुक येथे पोलादपूर पंचायत समितीचे माजी उपसभापती तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते शैलेश सलागरे यांनी मंत्री भरत गोगावले यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला आहे.

याचवेळी पोलादपूर तालुक्यातील उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेना आणि शिवसेना पक्षाच्या कार्यकर्त्यांनी माणगाव येथे खासदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या नेतृत्वाखाली कुणबी भवन सभागृहामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केल्याने रायगड जिल्हा परिषद आणि पोलादपूर पंचायत समितीच्या खोळंबलेल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलादपूर तालुक्यातील राजकीय घडामोडी गतिमान झाल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करणाऱ्यांमध्ये उबाठा तालुकाप्रमुख अनिल मालुसरे आणि गोरक्षण दीपक उतेकर या प्रमुख कार्यकर्त्यांचा समावेश आहे.

पोलादपूर तालुक्यात मंत्री भरत गोगावले यांच्या विकासकामांनी प्रेरित होऊन प्रवेशकर्ते माजी उपसभापती शैलेश विठोबा सलागरे यांच्या समवेत त्यांचे कुटुंबिय, शिवराम सावंत, अनिता सावंत, देवजी शेलार, सविता शेलार, अश्विनी शेलार, रेश्मा शेलार, शुभम शेलार, रेखा शेलार, नामदेव मोरे, राजाराम सपकाळ, सुनिता सपकाळ, भगवान सपकाळ, हिना सपकाळ, विठ्ठल पार्टे, मंगेश धर्माधिकारी, सुवर्ण धर्माधिकारी, बबन धर्माधिकारी, अनुसया धर्माधिकारी, तेजस पवार आदी कापडे बुद्रुक येथील कार्यकर्ते तसेच चांभारगणीतील विठोबा येरापले, दिनेश येरापले, प्रथमेश येरापले, विष्णु शिंदे, विमल शिंदे, विकी शिंदे, दर्शना येरापले, दीपिका येरापले, रुक्मिणी येरापले, पायल येरापले, प्रियंका येरापले, लक्ष्मी शिंदे, रोहित शिंदे, पायटे गावातील मधुकर निकम, प्रकाश निकम आदी कार्यकर्त्यांनी शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला.

मंत्री भरत गोगावले यांच्या माध्यमातून झालेल्या विकासकामांच्या धडाक्याचा प्रभाव असल्याने विकासगंगेमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतल्याचे यावेळी माजी उपसभापती शैलेश विठ्ठल सलागरे यांनी स्पष्टपणे सांगितले.




**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल**

**पिनकोड-४१०२०६**

E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in

दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४५२७७८ फॅक्स - ०२२-२७४६७४४०

**ई-कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. २७ (ई-निविदा) सन २०२५-२६**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२-२७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सूचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

टिप- या निविदेमध्ये एकूण १ काम समाविष्ठ असून ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक २७.१०.२०२५ सकाळी १०.०० ते दिनांक ०३.११.२०२५ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

**ई-निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड**
**दिनांक : २६/१०/२०२५**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल**


## 'ये तो सिर्फ ट्रेलर है... पिक्चर अभी बाकी है!

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे कार्यकर्ते, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुकाप्रमुख अनिल मालुसरे, शिवसेनेचे गोरक्षक दीपक उतेकर व तुर्भे खुर्द सरपंच गोविंद उतेकर यांनी माणगांव येथे कुणबी सभागृहात राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहिर प्रवेश केला.

या प्रसंगी खासदार सुनील तटकरे यांनी सर्वपक्षियांना 'ये तो सिर्फ ट्रेलर है....पिक्चर



अभी बाकी है...' असा गर्भित इशारा दिला.

या पक्षप्रवेश सोहळयाप्रसंगी महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस नानासाहेब तथा हनुमंत जगताप, कोकण संघटक ऍड.राजीव साबळे, जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, विधानसभा अध्यक्ष राजूशेठ कोरपे, जिल्हा प्रवक्ते धनंजय देशमुख, जिल्हा उपाध्यक्ष अण्णा अधिकारी, जिल्हा सरचिटणीस महादेव बक्कंम, युवक कार्याध्यक्ष शदाभाई गैबी, पोलादपूर नगरसेवक विरोधी पक्ष नेते दिलीप भागवत, महाड तालुका अध्यक्ष निलेश महाडीक, पोलादपूर तालुका अध्यक्ष विठोबा पार्टे, माणगाव तालुका अध्यक्ष काका नवगणे, खरवली सरपंच चैतन्य म्हामुणकर, आंबवडे सरपंच सचिन पवार, कोथेरी सरपंच अविनाश चौधरी, पोलादपूर तालुका युवक अध्यक्ष ऍड.सचिन गायकवाड, महाड तालुका अध्यक्ष मयूर निकम, पोलादपूर शहर अध्यक्ष स्वप्नील भुवड, नगरसेवक श्रावणी शहा, सान्वी गायकवाड, तेजश्री गरुड यांच्यासह जिल्हा, तालुक्यातील पदाधिकारी उपस्थित होते.

या प्रसंगी पोलादपूर तालुक्यातून पक्षप्रवेशासाठी लवाजमा माणगांव येथे रवाना झालेल्या प्रवेशकर्ते अनिल मालुसरे, दीपक उतेकर, तुर्भे खुर्द सरपंच गोविंद उतेकर, माजी सरपंच नरेंद्र पार्टे, युवासेना अक्षय करंजे, युगज्ञा उतेकर, प्रताप उतेकर, दत्ताराम उतेकर, या कार्यकर्त्यांनी पक्ष प्रवेश केला.


**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. cost |
|---|---|---|
| **Tend-5/25-26 7000037416 2nd call** | Procurement of 33kV PT & 22kV PT required at various substation under EHV (O&M) Circle, Panvel. **Tender Fee Rs. 500/- +GST** | **Rs. 540724/-** |

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 24.10.2025 to 04.11.2025 up to 11:00 hrs, Opening date:- 04.11.2025 @ 11:30 Hrs.**

For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**

**Contact Person:** The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459625, Mob. No. 8412050202 E-mail ID: **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

# छटपूजेसाठी नवी मुंबई पालिकेची तयारीच नाही!

## भाजपच्या माजी नगरसेविका माधुरी सुतार यांनी प्रशासनाला विचारला जाब

**नवी मुंबई : बातमीदार**

रविवार २६ ऑक्टोबर रोजी दुपारी माधुरी सुतार त्यांच्या सहकार्य समवेत तलावाच्या ठिकाणी पाहणी केली. प्रत्यक्षस्थळी त्या तलावातील गाळ हा उपसला न गेल्यामुळे देव देवतांच्या मूर्ती, काही ठिकाणी निर्माल्य, वाढलेले शेवाळे, प्लास्टिकच्या बाटल्या, पिशव्या वगैरे पाण्यात आढळून आल्या. तलावाच्या पाण्याला दुर्गंधी येत होती. याबाबत माजी नगरसेविका सुतार यांनी प्रशासनावर नाराजी व्यक्त केली. छट पूजेसाठी भाविक मोठ्या संख्येने तलावावर जमणार आहेत.पालिकेकडून तलाव परिसरात कोणतीही स्वच्छता आठव छट पूजेसाठी तयारी केली गेली नसल्याची खंत सुतार यांनी व्यक्त केली



गणेशोत्सव व दुर्गा उत्सव हे आपल्या भारतातील मोठ्या प्रमाणावर साजरे होणारे उत्सव आहेत. हे दोन्ही उत्सव पार पडले आहेत. मात्र त्यांनंतर तलावाची स्वच्छता पार पडलेली नाही.

या उत्सवापूर्वी आणि उत्सवानंतरही प्रशासनाने आपले काम ज्यामध्ये साफसफाई, नागरिकांनाची होणारी गर्दी व त्याच्या नियोजनासाठी जास्तीत जास्त प्रवेशद्वार,विसर्जनासाठी असलेला सुसज्ज घाट, निर्मल्याची वेळोवेळी विल्हेवाट निर्माल्य कलशाचा उपसा, तलाव परिसराची तथा बाजूलाच असणाऱ्या गार्डनची नित्यनियमाने साफसफाई, तलावातील साठलेला गाळ उपसून पाण्याची साफसफाई यासारख्या इतर सर्व सोयीसुविधा ह्या नागरिकांच्यासाठी न मागताच पुरवल्या जाणे आवश्यक आहे असे माधुरी सुतार म्हणल्या. लोकप्रतिनिधींनी याबाबत पाठपुरावा करूनसुद्धा प्रशासन काम करत नाही असं निदर्शनास येत असल्याचे सुतार म्हणाल्या. दिवाळीनंतर छटपूजा हा उत्तर भारतीय समाजाचा फार मोठा सण आहे तो सोमवार दिनांक २७ ऑक्टोबर रोजी सुरू होणार आहे. दुर्दैवाने त्याबाबत देखील नियोजन प्रशासनाने केले नसल्याचे दिसून येत आहे

तिथे येणारे भाविक हे स्वतः हातात झाडू घेऊन त्या परिसराची स्वच्छता करताना दिसून आले. त्या तलावाच्या पायऱ्यांवर शेवाळे तयार झाल्याने पायऱ्या निसरड्या झाल्या आहेत. छट पूजेला उत्तर भारतीय स्त्रिया तलावात उतरून पूजा करत असतं मात्र पायऱ्या निसरड्या झाल्याने त्यावरून घसरून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही असे माधुरी सुतार यांनी सांगितले.

# तुर्भे येथील आयसीएल बसथांब्याला अनधिकृत पार्किंगचा विळखा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती (-झचउ) समोरील आणि आयसीएल शाळेजवळील बस थांब्याचा परिसर सध्या अनधिकृत पार्किंगमुळे अडचणीत सापडला आहे. प्रवासी बस थांबा परिसरात दररोज मोठ्या संख्येने वाहनं थांबत असताना, खासगी चारचाकी आणि मालवाहतूक गाड्यांच्या अनधिकृत पार्किंगमुळे प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. शिवाय बस स्थानक परिसरात डाव्या आणि उजव्या बाजूला 'नो पार्किंग' फलक लावण्यात आले आहेत.



त्यामुळे स्थानकाच्या दोन्ही बाजूला ३० मीटर परिसरात वाहन पार्क करताना येणार नाही. असा थेट संदेश फलकावरून दिला जात असून देखील या ठिकाणी वाहने पार्क केली जात आहेत. शिवाय या बस स्थानकापासून हाकेच्या अंतरावर एपीएमसी वाहतूक विभाग कार्यालय आहे. तरी देखील वाहतूक विभागाच्या नाकावर टिचून कोणतीही भीडभाड न बाळगता येथे वाहने पार्क केली जात आहेत.

येथील बस स्थानकाच्या समोरच अनेक वाहनं कायमस्वरूपी उभी असतात. त्यामुळे बस मध्ये प्रवाशांना चढ-उतार करताना मोठा त्रास सहन करावा लागतो. शिवाय पार्किंग वाहनांमुळे बस थांब्यापासून खूप अंतर मुख्य रस्त्यात थांबते, अशावेळी बस पकडताना अपघाताची भीती निर्माण होते. अनेकदा बस पकडताना आयसीएल शाळेच्या विद्यार्थी आणि येथील जेष्ठ नागरिकांना कसरत करावी लागते. काही वेळा या ठिकाणी प्रचंड वाहतूक कोंडीही निर्माण होते.

या परिसरात वाहतूक पोलिसांकडून कारवाई करण्याची मागणी होत आहे. अन्यथा येथील अनधिकृत पार्किंगचा प्रश्न कायम असाच सुरु राहील असे नागरिक सांगत आहेत. विशेषतः बाजार समिती परिसरात व्यापारी, ट्रक चालक, बाजारात येणारे ग्राहक आणि स्थानिक वाहनचालकांच्या गाड्या येथे पार्क केल्या जातात. वाशी येथे बांधण्यात आलेल्या पार्किंग स्थळाच्या धर्तीवर बाजार समितीला लागून असलेल्या नाल्यावर देखील पार्किंग स्थळ उभी करण्याची मागणी केली जात आहे. येथे येणाऱ्या वाहनांच्या पार्किंगची सोय किंवा तिचे नियोजन नीट न झाल्याने येथील पार्किंग आणि वाहतुकीचा प्रश्न गंभीर बनला आहे.

**तुर्भे इथं नवी मुंबई मधील मुख्य बाजारपेठ असल्याने नागरिकांना खरेदीला नियमित ये-जा करावी लागते. या बस थांब्यावर नवी मुंबई परिवहन, बेस्ट तसेच केडीएमटी याच्या बसेस थांबत असल्याने इथं प्रवाशांची मोठी गर्दी नेहमी असते.इथं बस मध्ये जीवमुठीत घेऊनच चढ-उतार करावी लागते**
**-लक्ष्मण सणस, प्रवासी**

येथील वाहतूक विभागाने बस थांबा परिसरात कडक वाहतूक नियंत्रण, नियमित दंडात्मक मोहीम आणि योग्य दिशादर्शक फलक बसवावेत, जेणेकरून प्रवाशांना आणि वाहनचालकांना दिलासा मिळेल. स्थानिक प्रशासनाने याकडे लक्ष देऊन तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे, अन्यथा हा वाहतुकीचा विळखा अधिक गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# गोरगरीबांसाठी विनाशुल्क नोटरी कार्यालय सुरू



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

गोरगरीब गरजूंना शासकिय कामात अडचणी येवू नयेत यासाठी अ‍ॅड.प्रमोद मैंदर्गीकर यांनी नोटरी कार्यालय सुरू केले आहे. प्रमोद यांच्या पत्नी चित्रा मैंदर्गीकर यांना समाजसेवेची आवड असून आदीवासी बांधव, विधवा महिला, नादार व्यक्ति, दारिद्र रेषेखालील व्यक्ति यांना विनाशुल्क नोटरी करून देणार असल्याचे दोघा पती पत्नीनीं बोलताना सांगितले.

या कार्यालयाच्या उद्घाटनावेळी माजी सभापती रमेश पाटील, माजी सरपंच रोशन राऊत, शशिकांत मुकादम, कृष्णा पारंगे, माजी उपसरपंच दत्ता खाने, सद्‌गुणा पाटील, सुवर्णा मुंढे, अजितशेठ सावंत, निलेश जुनघरे, राकेश खराडे उपस्थित होते.

दरम्यान, मोहोपाडा येथे नोटरी कार्यालय सुरू झाल्याने रसायनी पाताळगंगा परिसरातील नागरिकांना नोटरीसाठी खालापूर, कर्जत, पनवेलला जाण्याची गरज लागणार नसून त्यांचा वेळ व पैसा वाचणार आहे.

## आमदार मंदा म्हात्रेंनी भाविकांना केले मिठाई वाटप

**नवी मुंबई :** महाराष्ट्रातील तुळजापूर हे साडेतीन शक्तिपीठांपैकी एक असून येथे महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी विराजमान आहे. अक्कलकोट हे श्री स्वामी समर्थांच्या अद्वैत ज्ञानभूमीमुळे ओळखले जाते. तर पंढरपूर हे श्री.विठ्ठल-रुक्मिणीच्या भक्तीमय वारकऱ्यांचे पवित्र तीर्थक्षेत्र आहे. या तीनही देवस्थानांचे दर्शन आ. मंदा म्हात्रे व त्यांच्या कुटुंबीयांनी घेतले. यावेळी दिवाळीनिमित्त मंदिर परिसरातील भाविकांना मिठाई वाटप करत, दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी बोलताना आमदार मंदा म्हात्रे म्हणाल्या, या पवित्र क्षणी आई भवानीच्या कृपेने सर्वांच्या आयुष्यात सुख, समृद्धी आणि आरोग्य नांदो, हीच माझी मनोकामना आहे.

# जीपी रेटिंग प्री-सी ट्रेनिंग कोर्ससाठी सामंजस्य करार

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

देशातील १३ वे प्रमुख बंदर असलेल्या वाढवन पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड (व्हीपीपीएल) ने काल २४ ऑक्टोबर २०२५ रोजी शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एससीआय) मेरीटाईम ट्रेनिंग इन्स्टिटयूट (एमटीआय) सोबत जीपी रेटिंग प्री-सी ट्रेनिंग कोर्स संयुक्तपणे आयोजित करण्यासाठी एक सामंजस्य करार (एमओयू) केला. या सामंजस्य करारावर जेएनपीएचे अध्यक्ष आणि व्हीपीपीएलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक उन्मेष वाघ आणि एससीआयचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक कॅप्टन बिनेश कुमार त्यागी यांनी स्वाक्षरी केली.



सहमतीनाम्याचा उद्देश असा आहे की, व्हीपीपीएल द्वारे प्रायोजित उमेदवारांसाठी एससीआय -एमटीआय हा कोर्स आयोजित करेल, ज्यामध्ये समुद्री क्षेत्रातील आवश्यक कौशल्ये आणि ज्ञान प्रदान करून त्यांना समुद्री क्षेत्रातील करिअरसाठी तयार केले जाईल. एससीआय मॅरीटाईम ट्रेनिंग इन्स्टिट्यूटची स्थापना शॉर आणि फ्लीट कर्मचारी यांच्या प्रशिक्षण व पुनः प्रशिक्षणाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी करण्यात आली आहे. कंपनी आणि भारत सरकारच्या दृष्टिकोनानुसार ही सेवा बाह्य सहभागींनाही प्रदान केली जाते, जेणेकरून भारत एक प्रगत समुद्री देश बनू शकेल.

व्हीपीपीएल वाढवण बंदराच्या परिसरातील गावांमध्ये राहणाऱ्या स्थानिक तरुणांना कौशल्य-आधारित उपजीविकेचे प्रशिक्षण देण्यास इच्छुक आहे. त्यांना शिपिंग क्षेत्रात रोजगाराच्या संधींचा शोध घेता येईल. एससीआय मेरीटाईम ट्रेनिंग इन्स्टिट्यूट सोबतच्या या सहकार्याद्वारे, आम्ही या तरुणांना भारताच्या सागरी परिसंस्थेच्या वाढीस हातभार लावताना फायदेशीर सागरी कारकीर्द घडवण्याचा मार्ग तयार करण्याचे उद्दिष्ट ठेवित असल्याचे जेएनपीएचे अध्यक्ष उन्मेष वाघ यांनी म्हटलेअसून,एससीआय-एमटीआयला जीपी रेटिंग प्री-सी ट्रेनिंग कोर्स आयोजित करण्यासाठी शिपिंग महासंचालनालयाची मान्यता आहे. प्रशिक्षण कोर्सचा कालावधी सहा महिने असल्याचेही वाघ यांनी नमूद केले.

प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर आणि सीफेरर्स ट्रस्ट (बेस्ट) साठी परीक्षा मंडळाने घेतलेल्या एक्झिट परीक्षेत उत्तीर्ण झाल्यानंतर, बेस्टकडून प्रमाणपत्र जारी केले जाईल.

या उपक्रमाचा एक भाग म्हणून, व्हीपीपीएलने कौशल्य विकास कार्यक्रमाची नोंदणी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी आणि आगामी अभ्यासक्रम आणि संधींबद्दल माहिती प्रदान करण्यासाठी एक समर्पित चॅटबॉट सुरू केला आहे.

# सिडकोच्या तारा प्रशिक्षण केंद्रात चोरीचा प्रयत्न

**नवी मुंबई : बातमीदार**

सिडको कार्यालयाच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. बेलापूर रेल्वेस्थानक संकुलातील सिडकोच्या तारा प्रशिक्षण केंद्रात मंगळवारी रात्री चोरीचा प्रयत्न झाला. परंतु, तेथील सुरक्षारक्षकांनी हा प्रयत्न हाणून पाडला. सुरक्षारक्षकांनी कार्यालयात घुसलेल्या चोरट्याला पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. मंगळवारी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास हा प्रकार घडला.

घटनास्थळीहजर असलेल्या सुरक्षारक्षक आर. के. घरत व एम. एन. घरत यांनी एका अज्ञात इसमाला खिडकीतून आत प्रवेश करण्याचा प्रयत्न करताना पाहिले. त्यांनी त्याला ताब्यात घेऊन सुरक्षा पर्यवेक्षक विशाल घरत यांना माहिती दिली. घरत घटनास्थळी दाखल होऊन त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे दोन चाकू व पकड आढळून आली. त्यानंतर त्या तरुणाला सीबीडी बेलापूर पोलिसांच्या हवाली केले.चोरी करणारा गर्दुल्ला असून त्याच्याकडे कोणताही चोरीचा मुद्देमाल सापडला नाही

# 'गुडबाय पोलिओ'चा संदेश देत प्रकाशमान झाली नवी मुंबई मुख्यालय इमारत

## मनपा हद्दीत ७६,८१८ बालकांना पोलिओ लसीकरण

**नवी मुंबई : बातमीदार**

पोलिओ प्रतिबंध आणि पोलिओचे उच्चाटन करण्याचा निश्चय करून त्याबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी २४ ऑक्टोबर हा दिवस संपूर्ण जगभरात 'जागतिक पोलिओ दिन' म्हणून साजरा केला जातो. 'पोलिओमुक्त जग' हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी त्याबाबत सुरु असलेल्या कामांना प्रोत्साहित करीत लसीकरण मोहिमांचे महत्व या दिवशी अधोरेखीत केले जाते.



या वर्षीची पोलिओ दिनाची संकल्पना 'पोलिओ समाप्त करा : प्रत्येक बालक, प्रत्येक लस, प्रत्येक ठिकाणी ' ही असून त्यादृष्टीने जागरुकता निर्माण करण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने विशेष मोहीम राबविण्यात आली. यामध्ये रोटरी क्लब ऑफ नवी मुंबई जॉय ऑफ गिव्हिंग आणि आरसीसी नवी मुंबई शेपर्स यांचे सहकार्य लाभले. या अनुषंगाने आयकॉनिक इमारत म्हणून ओळखल्या जाणा-या नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालय इमारतीवर 'आता पोलिओ संपवा', 'गुड बाय पोलिओ ', 'चला, भारताला पोलिओमुक्त करुया ' - असे प्रकाशमान संदेश मुख्यालयाच्या मध्यवर्ती डोमवर प्रसारीत करण्यात आले.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने पोलिओ मुक्तीसाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करण्यात येत असून १२ ऑक्टोबर रोजी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली 'विशेष पोलिओ लसीकरण मोहीम' राबविण्यात आली. या दिवशी ७२१ इतक्या मोठ्या संख्येने पोलिओ बुथ कार्यान्वित करण्यात आले होते. त्यादिवशी ८८ हजार ७४८ अपेक्षित लाभार्थ्यांपैकी ८६ टक्के म्हणजे ७६ हजार ८१८ बालकांना लसीकरण करण्यात आले.

यादिवशी लसीकरण न झालेल्या बालकांच्या लसीकरणासाठी १७ ऑक्टोबरपर्यंत विशेष मोहीम राबविण्यात येऊन ८२६ आरोग्य पथकांनी घरोघरी जाऊन लसीकरण केले. अशाप्रकारे १२ ते १७ ऑक्टोबर कालावधीत नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने उद्दिष्टापेक्षा अधिक म्हणजेच एकूण ९२ हजार २४२ बालकांचे पोलीओ लसीकरण करण्यात आले.

पोलीओमुक्त भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्र पोलीओमुक्त व्हावे दृष्टीने महानगरपालिका नियोजनबध्द पावले उचलत असून जन्मानंतर प्रत्येक मुलाला दिल्या जाणा-या विविध लसींप्रमाणेच पोलीओ लसीचे २ थेंब मिळावेत याबाबत महानगरपालिका सतर्क असल्याचे सांगत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी दिवाळीनिमित्त महापालिका मुख्यालयाची इमारत दिवाळी निमित्त विविध रंगाने सजलेली असतांना त्यामध्ये पोलीओ विषयक जनजागृतीचा गुलाबी रंगही प्रदर्शित करण्यात आला असल्याचे सांगितले.

यामध्ये रोटरी क्लब ऑफ नवी मुंबई जॉय ऑफ गिव्हिंग यांनी मानवतावादी भूमिकेतून सहभाग घेतला.

## चिंतामणी बाल युवक मंडळाने साकारली 'शिवनेरी'ची प्रतिकृती



**उरण : बातमीदार**

श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचार व कार्याने प्रभावित झालेल्या उरण शहरातील कामठा येथील चिंतामणी अपार्टमेंटच्या ग्राउंड फ्लोअरमध्ये चिंतामणी बाल युवक मंडळाने दिवाळी सणाचे औचित्य साधून कोकणातील परंपरा जपत माती व विविध साहित्याचा वापर करून शिवनेरी किल्ला बांधला आहे.

या मंडळाच्या बाळगोपाळानी हुबेहूब शिवनेरी किल्ल्याची प्रतिकृती साकारली आहे. या बालकांची या गड किल्ले सजावट व बांधणीच्या माध्यमातून श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्य व विचारा विषयी अत्यंत निष्ठा प्रेम आस्था दिसून आली. चिंतामणी बाल युवक मंडळ कामठा तर्फे दिवाळी मध्ये दरवर्षी वेगवेगळ्या किल्ल्यांची प्रतिकृती साकारली जाते. यंदा शिवनेरी किल्ल्याची प्रतिकृती साकारली गेली आहे. गेली १० वर्षे या मंडळाचे बाळगोपाळ, कार्यकर्ते हे गड किल्ले बांधत आहेत.या सर्व मावळ्यांनी गड किल्ले बांधून स्वराज्याप्रती व महाराजांच्या प्रती आपली निष्ठा दाखवली आहे. सदर बांधलेला किल्ला अत्यंत सुंदर व आकर्षक आहे. सर्वांना मंत्रमुग्ध करणारा असल्याने सर्वच क्षेत्रातील मान्यवरांनी बांधलेल्या किल्ल्याचे व चिंतामणी बाल युवक मंडळाच्या सर्व पदाधिकारी सदस्यांचे कौतुक केले आहे.

# दीपावलीनिमित्त कर्तव्यदक्ष सुरक्षा कर्मचाऱ्यांचा सन्मान

**नवी मुंबई : बातमीदार**

दिवाळीच्या निमित्ताने सिडको महामंडळात महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या माध्यमातून कार्यरत असणार्या सुरक्षा सहाय्यक, सुरक्षा पर्यवेक्षक, मुख्य सुरक्षा रक्षक व सुरक्षा रक्षकांना कर्तव्यावर असताना दाखवलेल्या सतर्कतेबद्दल गौरविण्यात आले.

सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांनी सन्मानपत्र देऊन २३ सुरक्षाकर्मींचा सन्मान केला. या वेळी मुख्य सुरक्षा अधिकारी किसन गायकवाड उपस्थित होते.

२५ सप्टेंबर रोजी ट्रान्स हार्बर मार्गावर रेल्वेगाडीने प्रवास करताना नकळत पालकांच्या हातून दोन वर्षांची मुलगी निसटली होती. या वेळी सुरक्षा रक्षक सचिन घरत, अनिल जाधव आणि महिला सुरक्षा रक्षक प्रियंका देशमुख यांनी कर्तव्यावर दाखविलेल्या सतर्कतेमुळे सदरची मुलगी आई, वडीलांना सुखरुपपणे मिळवून दिल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

२०२५ या वर्षात सिडकोने खारघर, उलवे, कळंबोली, कामोठे, पनवेल व द्रोणागिरी नोड, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ क्षेत्रात डम्पिंग विरुध्द गस्त व भरारी पथकाने केलेल्या कामगिरीबद्दल सुरक्षा सहाय्यक रमेश वेदांते, सुरक्षा पर्यवेक्षक लक्ष्मण देवडकर, रंजित शिवणगेकर, आत्माराम इंगोले, नितिन दामगुडे आणि मुख्य सुरक्षा रक्षक विनोद शेवाळे, अजिनाथ शेकडे, निलेश जाधव, प्रकाश खेमणार, यशवंत पाटील, प्रविण पाटील, अतुल कांबळे, योगेश काटकर, जगदीश परसणे, लोकेश जाधव तसेच रायगड जि.सु.मंडळाचे चेतन पाटील, सतिश भोपी, मेघशाम देसाई, शेखर कोळी, रोशन कोळी यांना सिडकोतर्फे गौरविण्यात आले. या कार्यक्रमास प्रतिसाद लाभल्याचे दिसून आले.



# विविध मागण्यांसाठी ठाकूर आदिवासी बांधवांची पाली तहसील कार्यालयावर धडक



**सुधागड : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील घोडगाव, गावठेवाडी, नवेवाडी, भागाची वाडी व ओवळ्याची वाडी येथील ठाकूर आदिवासी समाज बांधवांनी चिखलगाव ते घोडगाव या मुख्य रस्त्याच्या दुरवस्थेसह वाड्यांमधील इतरही अनेक समस्यांबाबत लक्ष वेधण्यासाठी शुक्रवारी (ता. २४) पाली तहसील कार्यालयावर धडक मोर्चा काढला होता. या वेळी निवासी नायब तहसीलदार भारत फुलपागारे यांना समस्यांबाबतचे निवेदन देण्यात आले.

या वेळी आदिवासी बांधवांनी सांगितले की, आमच्या समस्यांचे संबंधित विभागाकडून तत्काळ निवारण करावे; अन्यथा आम्ही सर्व आदिवासी बांधव आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या मतदानावर बहिष्कार टाकू आणि यास सर्वस्वी जबाबदार उदासीन प्रशासन असेल.

यावेळी सह्याद्री आदिवासी ठाकूर समाज संस्थेचे अध्यक्ष गोविंद लेंडी उपाध्यक्ष चंद्रकांत वरगुडे, ताया सिंगवा, मारूती डोके, महादू दोरे, धर्मा सिंगवा, चाऊ सिंगवा, परशुराम दोरे चंद्रकांत सिंगवा, सुभाष सिंगवा, जानू सिंगवा, अनंता सिंगवा, जानू मेंगाळ आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

सह्याद्री आदिवासी ठाकूर समाज संस्था सुधागड अध्यक्ष गोविंद लेंडी यांनी सांगितले की, सुधागड तालुक्यातील आदिवासी ठाकूर समाज बांधव शासकीय तसेच नागरी सुविधापासून वंचित आहेत. ठाकूर वाड्यांना रस्ते नसल्यामुळे आजारी तसेच गरोदर बायकांना झोळी करून शहराठिकाणी घेऊन जावे लागत आहे. त्यामुळे या वाड्यांमधील ग्रामस्थांनी निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. याचा गांभिर्याने विचार करावा.

या वाड्यांमधील ग्रामस्थांना मुख्य रस्त्यासह अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था, गटारे नसल्याने वाड्यांमध्ये दुर्गंधी, स्मशानभूमीसह स्मशानभूमी रस्त्यांची दुरवस्था, व्यायामशाळेसह अंगणवाडीची दुरवस्था व महावितरणच्या नादुरुस्त विद्युत वाहिन्यांसह विद्युत पोलची दुरवस्था अशा समस्या भेडसावत आहेत. या सर्व समस्यांचे निराकरण करण्यात यावे.

# राष्ट्रवादीच्या ग्रामपंचायत सदस्यांसह कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यातील गोरेगाव विभागातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या विद्यमान ग्रामपंचायत सदस्यांसह कार्यकर्त्यांनी मंत्री भरत गोगावले यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत जाहीर प्रवेश केला आहे.

चिंचवली ग्रामपंचायतीच्या सदस्य अंजली राजेश चव्हाण, रोहिणी रामलाल जाधव, बेबी पवार, सुरेखा पवार, जयश्री साळुंखे, नमिता जाधव, ज्योती माने आणि राजेश चव्हाण यांच्यासह महिला मंडळ व ग्रामस्थांनी राष्ट्रवादी काँग्रेसमधून शिवसेनेमध्ये प्रवेश केला. या पक्षप्रवेशावेळी गोरेगाव विभागातील शिवसेना, युवासेना पदाधिकारी उपस्थित होते.



# लोकसहभागातून सुरक्षिततेकडे वाटचाल

### वेळास दळवीवाडीत पाच सीसीटीव्ही कॅमेरे बसवले

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

गाव सुरक्षित तर मन निर्धास्त या भावनेतून वेळास दळवीवाडी येथील ग्रामस्थांनी लोकसहभागातून आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करत गावाची सुरक्षा अधिक बळकट केली आहे. गावात एकूण पाच सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची स्थापना करण्यात आली.

गावोगावी होणाऱ्या चोऱ्या आणि अनोळखी व्यक्तींच्या हालचालींना आळा बसावा तसेच गावातील शांतता व सुरक्षितता अबाधित राहावी यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. या कॅमेऱ्यांच्या मदतीने गावातील प्रत्येक महत्त्वाच्या ठिकाणी २४ तास नजर ठेवली जाणार आहे. विशेष म्हणजे बहुतांश गावकरी मुंबईत वास्तव्यास असल्यामुळे आता त्यांना आपल्या घरासमोरील परिसर आणि गावातील घडामोडी मोबाईलवरून थेट पाहता येतील. त्याचप्रमाणे गावातील सण-उत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम मुंबईवरून 'लाईव्ह' पाहता येणार असल्याने गावाशी भावनिक नाते अधिक दृढ होणार आहे.

या उपक्रमात गावकऱ्यांचा लोकसहभाग लक्षणीय ठरला. प्रशांत दळवी यांनी पाच सीसीटीव्ही कॅमेरे आणि संपूर्ण सेट पुरविला, धवल तवसाळकर यांनी कॅमेरे ऑनलाइन करण्यासाठी वाय-फाय सुविधा उपलब्ध करून दिली. राजेंद्र पालांडे यांनी एक बंडल वायर दिली, तर शुभम दळवी यांनी इंस्टॉलेशनचा संपूर्ण खर्च उचलला. वेळास दळवीवाडीने आधुनिकतेकडे एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे.

# श्रीवर्धनच्या दाबक पाखाडी परिसरात विनापरवाना वृक्षतोड

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन शहरातील दाबक पाखाडी परिसरात रस्त्याच्या कडेला असलेले गुलमोहराचे चांगले फुलणारे जिवंत झाड बाजूच्या जागा मालकाने कापून टाकल्याची घटना घडली आहे. अंदाजे ५० वर्ष वयाचे हे झाड या ठिकाणच्या नागरिकांना सावली देण्याचे काम करत असे. त्याचप्रमाणे त्याच्यावर गुलमोहर फुलल्यानंतर त्या ठिकाणचे दृश्य अतिशय मनमोहक दिसत असे. त्या ठिकाणी गुलमोहराची दोन झाडे होती. ही दोन्ही झाडे त्या बाजूच्या जागामालकाने शासनाची किंवा वनखात्याची कोणतीही परवानगी न घेता कापून काढली आहेत.



याबाबत माहिती घेतली असता श्रीवर्धन येथील अंजुमन हायस्कूलसमोर राहणारे बर्डे हे मुंबई येथे वास्तव्यास असतात. त्यांची त्या ठिकाणी वाडी आहे. या वाडीच्या जागेमध्ये पूर्वी चाळ होती. या चाळीमध्ये श्रीवर्धनचे जुने कोर्टदेखील होते, मात्र मागील वर्षी या वाडीची कुंपण काढून संपूर्ण चारी बाजूंनी पत्रे ठोकण्यात आलेले आहेत व आत मध्ये इमारत बांधण्याचे काम सुरू करण्याचा सदर जागा मालकांचा इरादा आहे. त्यामुळे समोरच असलेली दोन मोठी झाडे त्यांना अडथळा ठरत होती. त्यासाठी त्यांनी झाडे कापल्याचे उघड उघड बोलले जात आहे.

श्रीवर्धन शहराची ओळख श्रीमंत पेशव्यांची जन्मभूमी अशी असून नारळ, सुपारीच्या वाड्यांमध्ये वसलेले हे शहर अत्यंत निसर्गरम्य असे ठिकाण आहे. शहरात निसर्ग चक्रीवादळामुळे अनेक मोठमोठाले वृक्ष उन्मळून पडले. नारळाच्या, सुपारीच्या झाडांचे अतोनात नुकसान झाले. त्यामुळे श्रीवर्धन शहरावर असलेली सावली काही प्रमाणात नाहीशी झाली असतानाच अशा प्रकारे जर का झाडांची कत्तल होत राहिली तर शहराचे वाळवंट झाल्याशिवाय राहणार नाही, अशी खंत काही पर्यावरणप्रेमी नागरिकांनी व्यक्त केली आहे.

### वनखाते अनभिज्ञ

**काही बांधकाम व्यवसायिकांना या ठिकाणच्या असलेल्या वाड्या तोडून, टोलेजंग इमारती उभ्या करावयाच्या आहेत. त्यासाठी अशा प्रकारचे उद्योग सुरू आहेत. याबाबत वनखात्याच्या संबंधित अधिकाऱ्यांजवळ संपर्क साधला असून त्यांच्याकडूनदेखील कोणत्याही प्रकारची परवानगी घेतलेली नाही. किंवा श्रीवर्धन नगर परिषदेकडूनदेखील वृक्ष तोडण्याची कोणतीही परवानगी घेतली नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे आता वनविभागाने सदर जागामालकावर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी परिसरातील नागरिकांमधून केली जात आहे.**

# आदिवासी महिलांची भाऊबीज गोड

**नागोठणे : बातमीदार**

शांताबाई नारायणराव शेळके चॅरिटेबल ट्रस्ट शिहू, ता. पेण यांच्या माध्यमातून एक चकली सुखाची भेटवस्तू आनंदाची या उपक्रम अंतर्गत नागोठणेनजीकच्या मीरानगर, वरवठणे आदिवासीवाडी येथे दीपावली निमित्त साड्या व फराळ वाटप करण्यात आला.

शिहू गावाचे पुत्र सेवाभावी डॉ. रोहिदास नारायण शेळके यांच्या वतीने ट्रस्टच्या माध्यमातून नेहमीच समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात. मोलमजुरी करणाऱ्या आदिवासी कुटुंबाला आपल्या दैनंदिन गरजा पूर्ण करताना खूप अडचणी निर्माण होतात. आपणदेखील आपल्या घरात दिवाळी साजरी करावी असे प्रत्येकाला वाटते. अशा वंचित लोकांच्या भावनांचा विचार करून एक हात मदतीचा माणसातील माणुसकी जपण्याचा सामाजिक जाणीवातून आदिवासी भागात साड्या व फराळ वाटप करून डॉ. शेळके व ट्रस्टचे सदस्य यांनी दिवाळी साजरी केली.

या कार्यक्रमास नागोठणे पोलीस ठाण्याचे सहाय्यक उपनिरीक्षक राजहंस नागदिवे, हवालदार अथर्व पाटील, वरवठणे सरपंच ऋतुजा म्हात्रे, बापूमहाराज रावकर, राजा सोष्टे, गौतम जैन, डॉ. कांचन शेळके, जनार्दन शेळके, प्रदीप दळवी उपस्थित होते. सूत्रसंचालन पुंडलिक ताडकर यांनी केले.



# काव्यरंग मैफिलीत रसिक मंत्रमुग्ध

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

कोकण मराठी साहित्य परिषद, श्रीवर्धन शाखा आयोजित 'काव्यरंग' या साहित्य-संगीत मैफीलीचा मोहक कार्यक्रम श्री दत्त मंदिर सभागृहात उत्साहात पार पडला. कवितांच्या ओळी, गझलांचा लयबद्ध ताल आणि पोवाड्यांच्या जोशात रसिक मंत्रमुग्ध झाले.



कार्यक्रमाला कोमसाप रायगड जिल्हाध्यक्ष संजय गुंजाळ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या वेळी गंगाधर साळवी, संध्या दिवकर, प्रणय इंगळे आणि सिद्धेश लखमदे यांनी आपल्या काव्यरचना, पोवाडा आणि गझलांच्या सादरीकरणातून वातावरण भारावून टाकले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि सुसंवादकाची जबाबदारी हेमंत बारटक्के यांनी उत्तमरीत्या पार पाडली.

जिल्हाध्यक्ष संजय गुंजाळ यांनी आपल्या भाषणात सांगितले की, श्रीवर्धन शाखा दरवर्षी विविध उपक्रमांद्वारे साहित्यप्रेमी आणि नवोदित कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देते.

आजचा 'दीप संध्या' स्वरूपातील हा कार्यक्रम म्हणजे शब्द आणि भावनांचा अद्भूत संगम आहे.


कार्यक्रमाच्या व्यासपीठावर श्रीवर्धन शाखा अध्यक्षा सीमा रिसबूड, उपाध्यक्ष प्रसाद जोशी, जिल्हा प्रतिनिधी प्रवीता माने, सदस्य आनंद जोशी, तसेच म्हसळा शाखा अध्यक्ष संजय खांबेटे उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता साहित्यिक मैफिलीनंतर झाली. उपक्रमास चांगला प्रतिसाद लाभला.

# बहिरेश्वर जोगेश्वरी मंदिरात दीपोत्सव साजरा

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणेजवळील शिहू येथे श्री बहिरेश्वर जोगेश्वरी मंदिरात दीपोत्सव उत्सहात साजरा करण्यात आला. दीपोत्सवाच्या निमित्ताने संपूर्ण मंदिर परिसर दिव्यांच्या रोषणाईने उजळून निघाला होता.

गावातील एकोपा टिकवून राहण्याच्या उद्देशाने तरुणांच्या संकल्पनेतून शिहू गावात दीपोत्सव साजरा केला जातो. मंदिरात श्री बहिरेश्वर जोगेश्वरी मातेची रांगोळी स्वरूपात हुबेहूब प्रतिकृती वैष्णवी मोकल, सुजल मोकल, किमया पाटील या तरुणींनी साकारली होती. दीपोत्सवाचे हे सहावे वर्ष असून मंदिरातील गाभारा एक हजार दिव्यांनी सजवला होतो.



या आनंदोत्सवाला मात्र महावितरणाच्या गलथान कारभारामुळे दीपोत्सवाच्या आनंदाला विरजण लागल्याचे चित्र पहावयास मिळाले. ऐन दिवाळीच्या सणात विजेचा लपंडाव चालूच आहे. तासाभरासाठी गेलेली लाईट रात्ररात्रभर येत नाही. याबाबत महिलावर्ग, तरुणांनी नाराजी व्यक्त केली आहे.

# जिंदल विद्यामंदिरात पुस्तक प्रदर्शन

**मुरूड : प्रतिनिधी**

जिंदल विद्यामंदिर, साळाव येथे स्कोलॅस्टिक पब्लिकेशनच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या पुस्तक प्रदर्शनास विद्यार्थ्यांचा, पालकांचा आणि शिक्षकवर्गाचा प्रतिसाद लाभला.

या प्रदर्शनाचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्त्या नीलू मलिक यांच्या हस्ते झाले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण होण्यासाठी असे उपक्रम अत्यंत गरजेचे असल्याचे त्यांनी आपल्या भाषणात नमूद केले.

उद्घाटनप्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पंकज मलिक, शाळेचे प्राचार्य मुकेश ठाकूर, ग्रंथपाल वैभवी थत्ते तसेच इतर उपस्थित होते.

प्रदर्शनात विविध प्रकाशन संस्थांची शैक्षणिक, वैज्ञानिक, कथा, चरित्र, बालसाहित्य व मनोरंजक पुस्तके उपलब्ध होती. विद्यार्थ्यांनी उत्साहाने पुस्तकांचे अवलोकन करून आवडती पुस्तके खरेदी केली. प्राचार्य ठाकूर यांनी उपस्थितांचे व प्रकाशन संस्थांचे आभार मानले तसेच विद्यार्थ्यांना नियमित वाचन करण्याचे महत्त्व पटवून दिले.

# डीएमसीसी कंपनीला पुरस्कार

**धाटाव : प्रतिनिधी**

सह्याद्री मार्शल आर्ट ऑफ महाराष्ट्रच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित सोहळ्यात सह्याद्रीचा बहुमान हा पुरस्कार धाटाव वसाहतीतील डीएमसीसी कंपनीला प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार सोहळा रोहा शासकीय विश्रामगृह येथे झाला.



या वेळी कंपनीचे एचआर मॅनेजर अनिल जांभळे, वैद्यकीय अधिकारी राकेश खांडेकर आणि केतन पवार उपस्थित होते. त्याचबरोबर विविध क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी, सदस्य हजर होते.


# दिवाळीच्या सुट्टीत श्रीवर्धनचा किनारा पर्यटकांनी गजबजला

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

दिवाळीच्या सुट्टीत कोकणचा निसर्ग, समुद्र आणि संस्कृती अनुभवण्यासाठी राज्यभरातील पर्यटकांचा ओघ श्रीवर्धनकडे वाढला आहे. नारळी-पोफळीच्या झाडांनी सजलेला, शांत समुद्रकिनारा आणि इतिहासाच्या खुणांनी नटलेला श्रीवर्धन तालुका सध्या पर्यटकांच्या उत्साहाने हौसफुल झाला आहे.





श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर दिवसभर पर्यटकांची गर्दी उसळली असून, सायंकाळी रंगीत प्रकाशाने उजळलेला किनारा फोटोसेशन आणि फिरण्यासाठी आकर्षण ठरत आहे. स्वच्छ किनारा, सुबक वॉकिंग ट्रॅक, मुलांसाठी खेळण्याची ठिकाणं, सुशोभित उद्याने आणि डॉल्फिन सफारीचा थरार या सर्व गोष्टींनी श्रीवर्धनचा किनारा पर्यटकांसाठी 'आनंद नगरी' बनला आहे.

खासदार सुनील तटकरे, मंत्री आदिती तटकरे, आणि आमदार अनिकेत तटकरे यांच्या प्रयत्नातून किनाऱ्याचा विकास झाल्याने श्रीवर्धनला पर्यटनाचे नवे रूप प्राप्त झाले आहे. इतिहासप्रेमींसाठी पेशवेकालीन आठवणी जपणारा बाळाजी विश्वनाथ पेशवे प्रवेशद्वार, तसेच जिवनेश्वर कुंडातील रोषणाई, भुवनाळे तलाव आणि श्रीवर्धन शहरातील जुनी मंदिरे हे सारेच दिवाळीच्या सणात नव्या प्रकाशात उजळले आहेत.

पर्यटक दिवसभर फिरताना समुद्रकिनाऱ्यावरील ताज्या मासळीच्या लिलावाचा देखावा, डॉल्फिन सफारीचा थरार, तसेच हरिहरेश्वर आणि दिवेआगर या जवळच्या तीर्थ-पर्यटन स्थळांचा आनंद घेत आहेत. विशेषतः सुवर्ण गणपती मंदिर आणि अजिंक्य जंजिरा किल्ला हे ठिकाणे पर्यटकांना वेगळाच अनुभव देतात.

स्थानिक व्यावसायिक, होमस्टे, रिसॉर्ट्स, खाद्यगृहे आणि बोट ऑपरेटर्स यांच्यासाठीही ही गर्दी आर्थिक संजीवनी ठरते आहे. पर्यटकांचा ओघ वाढल्याने शहराचा प्रत्येक कोपरा उत्साहाने उजळला आहे. निसर्ग, इतिहास, अध्यात्म आणि ग्रामीण संस्कृती याचं सुंदर मिलन असलेलं श्रीवर्धन आज महाराष्ट्राच्या पर्यटन नकाशावर तेजाने झळकत आहे.

### तुटक्या रॅम्पच्या दुरूस्तीची मागणी

**दिवाळीच्या सुट्टीत श्रीवर्धन किनाऱ्यावर पर्यटकांची मोठी गर्दी उसळली असली तरी समुद्रात उतरण्यासाठीचा रॅम्प वादळामुळे तुटल्याने धोकादायक स्थितीत आहे. गेल्या पंधरा दिवसांत सात-आठ पर्यटक पडून जखमी झाल्याची माहिती मिळाली आहे. पर्यटकांनी जीव मुठीत धरून समुद्रात उतरण्याची वेळ येत असल्याने श्रीवर्धन नगरपंचायतीने तत्काळ दखल घेऊन रॅम्पची दुरुस्ती करावी, अशी मागणी होत आहे.**

# उपांत्य फेरीच्या लढतींचे चित्र स्पष्ट

## महिला वर्ल्डकपमध्ये इंग्लंड–द. आफ्रिका, भारत–ऑस्ट्रेलिया भिडणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महिला वनडे वर्ल्डकप स्पर्धेतील ऑस्ट्रेलिया विरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यातील २६व्या सामन्यातील निकालानंतर सेमीफायनलमध्ये कोणता संघ कोणाविरुद्ध भिडणार ते चित्र स्पष्ट झाले आहे. इंदूरच्या मैदानात रंगलेल्या सामन्यात ऑस्ट्रेलियन संघाने दक्षिण आफ्रिकेच्या संघाला सात विकेट्सनी मात दिली. या विजयासह ऑस्ट्रेलिया संघाने गुणतालिकेत अव्वलस्थानी झेप घेतली आहे. त्यामुळे आता दुसऱ्या सेमी फायनलमध्ये भारतीय संघासमोर ऑस्ट्रेलियन संघाचे तगडे आव्हान असणार आहे.




अलाना किंग हिच्या फिरकीच्या जोरावर पहिल्यांदा गोलंदाजी करताना ऑस्ट्रेलियन संघाने दक्षिण आफ्रिकेच्या संघाला ९७ धावांवर रोखले होते. या धावसंख्येचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाने तीन विकेट्स गमावल्या, पण शेवटी १६व्या षटकात विजयी डाव साधत अपराजित राहून गत चॅम्पियन ऑस्ट्रेलियन संघ अव्वलस्थानी पोहचला. धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियन संघाकडून जॉर्जिया वोल हिने ३८ चेंडूत नाबाद ३८ धावांची खेळी केली. याशिवाय बेथ मूनी हिने ४१ चेंडूत ४२ धावांचे योगदान दिले.

ऑस्ट्रेलिया संघाने सर्वाधिक वेळा वर्ल्ड कप स्पर्धा जिंकली असून यंदाच्या हंगामात वर्ल्डकप उंचावण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी टीम इंडियाला आता ऑस्ट्रेलियाला मात द्यावी लागेल. जर भारतीय संघाने ही लढाई जिंकली, तर निश्चितच टीम इंडिया फायनल बाजीही अगदी सहज मारेल. ३० ऑक्टोबरला नवी मुंबईतील डॉ. डी. वाय. पाटील स्पोर्ट्स अकादमीच्या स्टेडियवर भारत–ऑस्ट्रेलिया यांच्यात यंदाच्या वर्ल्डकप स्पर्धेतील दुसऱ्या सेमीफायनलचा थरार रंगल्याचे पाहायला मिळेल.

भारत–ऑस्ट्रेलिया यांच्यातील लढतीआधी गुवाहटीच्या बारासपारा क्रिकेट स्टेडियमवर इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात पहिली सेमीफायनल खेळवण्यात येईल. २९ ऑक्टोहरला भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी ३ वाजता हा सामना नियोजित आहे. दोन्ही सेमी फायनलमधील विजते संघ यंदाच्या हंगामातील जेतेपदासाठी २ नोव्हेंबरला एकमेकांविरुद्ध भिडतील.

# एमएनएम विद्यालयाचे ॲथलेटिक्स स्पर्धेत यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी अंतर्गत जिल्हास्तरीय अथलेटिक्स स्पर्धेत रिले व गोळाफेक या खेळामध्ये मोरू नारायण म्हात्रे व तुकाराम नारायण घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सच्या विद्यार्थिनींनी रौप्य व कांस्यपदक मिळविले. स्पर्धेचे आयोजन पिल्लई एचओसीएल स्कूल रसायनी येथील भव्य पटांगणावर करण्यात आले होते.

या स्पर्धेत १७ वर्षाखालील मुलींच्या रिले स्पर्धेत प्रिंजल कल्पेश म्हात्रे, सई अविनाश मोकल, प्रीती सहदेव घाडगे, स्वरा सचिन ठाकूर, प्रियांका लावस्कर या चमूने रौप्यपदक जिंकले. याशिवाय गोळफेकच्या १९ वर्षाखालील गटात राणू सोहनलाल डांगी हिने कांस्यपदक पटकाविले. क्रीडा शिक्षक वर्षा नलावडे, वामन कुराडे यांनी



विद्यार्थ्यांसाठी विशेष परिश्रम घेत स्पर्धेसाठी तयार केले होते.

जिल्हास्तरीय स्पर्धेतील कामगिरीबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. शाळेचे चेअरमन भार्गव ठाकूर, मुख्याध्यापिका सायली वडवलकर, तसेच माध्यमिक उच्च माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका प्रणिता गोळे, प्राथमिक विभागाचे पर्यवेक्षक अरुण जोशी आणि शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल कौतुक करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# उपकर्णधार श्रेयस अय्यर दुखापतग्रस्त

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय वनडे संघाचा उपकप्तान श्रेयस अय्यर याला ऑस्ट्रेलियाविरुद्ध सिडनी येथे झालेल्या तिसऱ्या वनडे सामन्यादरम्यान दुखापत झाली. क्षेत्ररक्षण करताना त्याच्या डाव्या बरगड्यांना दुखापत झाली असून यामुळे त्याला कमीत कमी तीन आठवड्यांसाठी मैदानापासून दूर राहावे लागण्याची शक्यता आहे.

बीसीसीआयच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार अय्यरला ३० नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या आगामी वनडे मालिकेसाठी उपलब्ध होणे अनिश्चित असेल.

सिडनी क्रिकेट ग्राउंडवर झालेल्या सामन्यात हर्षित राणाने टाकलेल्या चेंडूवर ऑस्ट्रेलियाचा



फलंदाज लेक्स कॅरीने उंच शॉट मारला. बॅकवर्ड पॉइंटवर उभ्या असलेल्या श्रेयस अय्यरने वेगाने धाव घेत एक अप्रतिम झेल पकडला, परंतु झेल घेतल्यानंतर खाली पडताना त्याच्या डाव्या बरगड्यांना जोरदार झटका बसला. तो वेदनेमुळे लगेचच जमिनीवर बसून राहिला. यानंतर त्याला मैदान सोडावे लागले आणि पुढील तपासणीसाठी रुग्णालयात नेण्यात आले.

### तीन आठवड्यांची विश्रांती?

बीसीसीआयच्या एका सूत्राने पीटीआय वृत्तसंस्थेला सांगितले, सामन्यादरम्यानच श्रेयसला स्कॅनसाठी रुग्णालयात नेण्यात आले. प्राथमिक तपासणीत त्याच्या बरगड्यांना झटका बसल्याचे समजते. त्याला किमान तीन आठवड्यांसाठी पूर्ण विश्रांती घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. जर स्कॅनमध्ये फ्रॅक्चर आढळले, तर त्याला अधिक काळ क्रिकेटपासून दूर राहावे लागू शकते.

# रणजी ट्रॉफीत करुण नायरचे शतक



**शिमोगा : वृत्तसंस्था**

इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत सपशेल अपयशी ठरलेला भारतीय संघातील क्रिकेटपटू करुण नायर याने आता रणजी करंडक स्पर्धेत कर्नाटककडून खेळताना गोव्याविरुद्ध दमदार खेळी केली आहे. एकीकडून संघातील इतर फलंदाज ठरावीक अंतराने बाद होत असताना करुणने एक बाजू लावून धरत नाबाद १७४ धावांची खेळी केली.

करुण नायरने सुमारे आठ वर्षांनंतर भारतीय संघात पुनरागमन केले होते तसेच इंग्लंड दौऱ्यातील चार कसोटी सामन्यात त्याला खेळण्याची संधी मिळाली होती, मात्र त्याला अपेक्षित कामगिरी करता न आल्याने निवड समितीने त्याला संघाबाहेर केले. काही दिवसांपूर्वी वेस्ट इंडिजविरुद्ध झालेल्या कसोटी मालिकेसाठी निवड समितीने त्याची संघात निवड केली नव्हती. आता आपल्यातील गुणवत्ता सिद्ध करत करुणने गोव्याविरुद्ध शतक ठोकले.

शिमोगा येथील केएससीए नवूल स्टेडियममध्ये गोवा आणि कर्नाटक यांच्यात सुरू असलेल्या या सामन्यात कर्नाटकचे चार गडी केवळ ६५ धावांत गारद झाले होते. त्यानंतर करुणने पहिल्या दिवसअखेर नाबाद ८६ धावा काढत संघाला सावरले, तर दुसऱ्या दिवशीही एक बाजू लावून धरत आपले शतक पूर्ण केले.

करुणने केलेल्या या शानदार शतकी खेळीच्या जोरावर कर्नाटकने पहिल्या डावात ३७१ धावांपर्यंत मजल मारली. करुण २६७ चेंडूत १७४ धावा काढून नाबाद राहिला. त्याने या खेळीदरम्यान १४ चौकार आणि तीन षटकार ठोकले.



# ऑस्ट्रेलियाचा आफ्रिकेवर विजय

**इंदूर :** लेग स्पिनर ॲलाना किंगने अवघ्या १८ धावांत सात बळी घेतल्यानंतर ऑस्ट्रेलियाने दक्षिण आफ्रिकेचा अक्षरशः धुव्वा उडवला. आपल्या शेवटच्या साखळी सामन्यात ऑस्ट्रेलियाने दक्षिण आफ्रिकेचा डाव अवघ्या ९७ धावांत संपुष्टात आणला आणि १६.५ षटकांत तीन बाद ९८ धावांसह एकतर्फी विजय संपादन केला.

ऑस्ट्रेलियाची हंगामी कर्णधार ताहलिया मॅकग्राने नाणेफेक जिंकून दक्षिण आफ्रिकेला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले, मात्र किंगच्या भेदक माऱ्यासमोर आफ्रिकेच्या फलंदाजांनी अक्षरशः नांगी टाकली. यादरम्यान, ॲलाना महिला विश्वचषक स्पर्धेच्या इतिहासात सात बळी घेणारी पहिलीच गोलंदाज ठरली. तिने ४३ वर्षे जुना विक्रम मोडला. यापूर्वी हा विक्रम न्यूझीलंडच्या जॅकलिन लॉर्ड यांच्या नावावर होता. जॅकलिनने १९८२मध्ये भारताविरुद्ध १० धावांत सहा बळी घेतले होते.

# फुटबॉलमधील भविष्यातील हिरे घडविण्यासाठी क्रीडा विभागाचा प्रोजेक्ट महादेवा

**ठाणे : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली प्रोजेक्ट महादेवा ही योजना महाराष्ट्रातील १३ वर्षांखालील मुला–मुलींच्या फुटबॉल कौशल्याचा शोध घेण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी सुरू करण्यात आली आहे.

निवड प्रक्रिया तीन टप्प्यांत पार पडणार आहे. जिल्हास्तरावरील निवड चाचण्या, प्रादेशिक फेरी आणि अंतिम निवड फेरी. अंतिम टप्प्यात ६० मुलांची निवड सीआयडीसीओ ग्राऊंड, खारघर येथे आणि ६० मुलींची निवड डब्ल्यूआयएफए कूपरेज मैदान, मुंबई येथे केली जाईल. यापैकी प्रत्येकी ३० मुला–मुलींची निवड केली जाईल आणि त्यांना पाच वर्षांची एकात्मिक शिष्यवृत्ती दिली जाईल, ज्यामध्ये फुटबॉल प्रशिक्षणासोबत शैक्षणिक विकासाचाही समावेश असेल. निवड झालेल्या खेळाडूंना १४ डिसेंबर रोजी मुंबईत येणाऱ्या आंतरराष्ट्रीय फुटबॉल स्टार लिओनेल मेस्सी यांच्या फुटबॉल क्लिनिकमध्ये सहभागी होण्याची अनोखी संधी मिळेल.


# अर्जेंटिना फुटबॉल संघाचा केरळमधील सामना लांबणीवर

**कोची : वृत्तसंस्था**

लिओनेल मेसीच्या नेतृत्वाखालील विश्वविजेत्या अर्जेंटिना संघाचा पुढील महिन्यात केरळ येथे नियोजित मैत्रीपूर्ण फुटबॉल सामना लांबणीवर गेला आहे. या सामन्यासाठी आंतरराष्ट्रीय फुटबॉल महासंघाची (फिफा) मान्यता मिळालेली नाही, असे केरळचे क्रीडामंत्री व्ही. अब्दुरहिमान यांनी सांगितले.

केरळमधील क्रीडा मंत्रालय आणि प्रायोजक अँटो ऑगस्टीन यांनी मिळून अर्जेंटिना संघ १७ नोव्हेंबर रोजी कोची येथे एक मैत्रीपूर्ण सामना खेळेल, असे आधी जाहीर केले होते, मात्र पुढील महिन्यात हा सामना होऊ शकणार नसल्याचे आता ऑगस्टीन यांनी स्पष्ट केले आहे. त्यांनी फेसबुक पोस्टच्या माध्यमातून ही माहिती दिली.

''फिफाची परवानगी मिळण्यास होणारा विलंब लक्षात घेता, अर्जेंटिना फुटबॉल संघटनेशी चर्चा केल्यानंतर नोव्हेंबरचा सामना पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे,'' असे ऑगस्टीन यांनी



आपल्या पोस्टमध्ये लिहिले. केरळमधील सामना पुढील आंतरराष्ट्रीय सामन्यांसाठी राखीव असणाऱ्या वेळेत घेण्यात येईल आणि नवीन तारीख लवकरच जाहीर केली जाईल, असेही त्यांनी नमूद केले आहे.

'फिफा'कडून परवानगी न मिळाल्याने मेसीसह अर्जेंटिना संघाचा सामना पुढे ढकलण्यात आला. यामुळे मेसीची आतुरतेने प्रतीक्षा करणाऱ्या केरळच्या फुटबॉल चाहत्यांच्या पदरी निराशा पडली आहे. दरम्यान, 'फिफा'ने त्वरित मंजुरी दिल्यास अजूनही ठरलेल्या दिवशी सामना होऊ शकेल, असा आशावादही अब्दुरहिमान यांनी व्यक्त केला आहे.

# निवडीनंतर हर्षितला दिली होती गंभीरने तंबी

**सिडनी : वृत्तसंस्था**

भारत आणि ऑस्ट्रेलिया क्रिकेट संघ शनिवारी सिडनीमध्ये भिडले. या सामन्यात वेगवान गोलंदाज हर्षित राणा याने ८.४ षटकांत ३९ धावा देत चार बळी घेतले. दुसऱ्या सामन्यातही त्याने चकमकदार फलंदाजी केली होती. तरीही याच्या निवडीवर काही प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते तसेच हर्षितला टीम इंडियाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनीही फटकारल्याचेही वृत्त समोर आले आहे.

हर्षितच्या एकदिवसीय संघातील निवडीवर प्रश्न उपस्थित केले जात असताना त्याचा लहानपणीचा प्रशिक्षक श्रवण कुमार यांनी गंभीर आणि हर्षित यांच्यातील फोनवरील संभाषणाचा तपशील उघड केला आहे. सिडनीच्या सामन्यात तर अर्शदीप सिंगऐवजी हर्षितची निवड प्लेइंग इलेव्हनमध्ये करण्यात आली



होती, ज्यामुळे अनेकांना आश्चर्य वाटले होते. हर्षितच्या निवडीवरील टीकेच्या पार्श्वभूमीवर गंभीरने कथितरित्या या युवा वेगवान गोलंदाजाला स्पष्ट शब्दात ताकीद दिली की, चांगला खेळ कर, नाहीतर संघाबाहेर बसवेन.

एका वृत्तपत्राशी बोलताना श्रवण कुमार म्हणाले की, हर्षितचा मला फोन आला होता. त्याने सांगितले की, माझ्या निवडीवर जे सवाल उपस्थित करत आहेत त्यांचा आवाज मला कामगिरीने बंद करायचा आहे. त्यावेळी मी फक्त म्हटले, स्वतः वर विश्वास ठेव. मला माहीत आहे की, काही क्रिकेटपटू म्हणतात, तो गंभीरच्या जवळ आहे. प्रतिभा कशी हेरायची याचे गंभीरला अजूक जाण आहे. त्याने अनेक क्रिकेटपटूंना पाठिंबा दिला आहे आणि त्यांनी त्यांच्या संघासाठी चमत्कार केले आहेत. गौतम गंभीरने हर्षितला स्पष्ट सांगितले होते की, संघासाठी सर्वोत्कृष्ट कामगिरी कर; अन्यथा बाहेर बसवावे लागले. तुम्ही कोणीही असलात तरी गंभीर हा खेळाडूंना स्पष्ट संदेश देतो, असेही स्पष्ट केले.

# जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत रातवड विद्यालयाचे यश

**माणगाव : प्रतिनिधी**

शैक्षणिक क्षेत्राबरोबरच क्रीडा क्षेत्रातही अग्रगण्य असणाऱ्या छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये शासन स्तरावर घेण्यात आलेल्या शालेय वयोगट क्रीडा स्पर्धेत सुयश मिळविले आहे.

धावणे व क्रॉस कंट्री स्पर्धेत विद्यालयाने उज्वल असे यश संपादन केले आहे. विद्यालयाचा विद्यार्थी विराज पवार (इयत्ता दहावी) याने १५०० व ३००० मीटर धावणे खेळ प्रकारात जिल्ह्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. जिल्हास्तरीय क्रॉस कंट्री प्रकारात अंतरा पवार (इयत्ता दहावी) हिने द्वितीय आणि संस्कृती फराडेने (इयत्ता दहावी) तृतीय क्रमांक मिळवला आहे. या सर्व विद्यार्थ्यांची विभागीय पातळीवर



होणाऱ्या स्पर्धेसाठी निवड झाली आहे. याशिवाय इयत्ता नववीतील निधी फराडे हिने १७ वर्षाखालील वयोगटात ८०० मीटर धावणे स्पर्धेत तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.

विभागीय पातळीवरील स्पर्धा मुंबई येथे २७, २८ व २९ ऑक्टोबर रोजी होणार असून विद्यालयाचे हे विद्यार्थी रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. त्यासाठी त्यांचा सध्या सराव सुरू आहे.

रातवड विद्यालयाच्या खेळाडूंनी मिळविलेल्या या यशाचे कौतुक होत असून छत्रपती शिक्षण मंडळ कल्याणचे अध्यक्ष डॉ. नंदकिशोर जोशी, सरचिटणीस डॉ. निलेश रेवगडे, शालेय समिती अध्यक्ष संजय पालकर, विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष कदम, सामाजिक कार्यकर्ते कृष्णा महाडिक, पालक व शिक्षकवृंद यांनी या विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले असून पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या. विभागीय स्पर्धेतही यश मिळेल, असा सर्वांना विश्वास आहे.

# रोहितसोबत फलंदाजी करणे सोपे –विराट

**सिडनी : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाविरुद्ध आधीच २–०ने मालिका गमावलेल्या टीम इंडियाने तिसऱ्या सामन्यात नऊ गडी राखून यजमानांचा पराभव केला. रोहित शर्माने नाबाद १२१ धावा करत संघाला विजय मिळवून दिला, तर विराट कोहलीनेही नाबाद ७४ धावांची खेळी करत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. ऑस्ट्रेलियन मैदानावर विराट–रोहित जोडीचा आजचा शेवटचा सामना होता. त्यामुळे भारतासाठी हा विजय खूपच विशेष ठरला. या विजयानंतर विराट कोहलीरोहित शर्माबद्दल तोंडभरून बोलला.



रोहितबरोबर फलंदाजी करणे मला खूप सोपे गेले. आम्ही दोघांनी सामना जिंकवला याचा मला आनंद आहे. रोहित आणि मी खूप वर्षांपासून एकत्र खेळतोय. त्यामुळे आम्ही एकमेकांना नीट समजू शकतो. आम्हा दोघांनाही सुरुवातीपासूनच खेळाची उत्तम समज आहे. यशस्वी होण्यासाठी आपल्याला खेळ समजून घेणे जमलेच पाहिजे. सुरुवातीपासूनच आम्ही एकत्र खेळून प्रतिस्पर्ध्यांना धूळ चारली आहे, असे विराट म्हणाला.

२०१३मध्ये घरच्या मैदानावर ऑस्ट्रेलियाविरुद्धच आमच्या पार्टनरशिपची सुरुवात झाली. आता सगळ्यांना माहितीये की, आम्ही २० षटके एकत्र खेळलो तर सामना भारताच्या बाजूने झुकणार. जेव्हा गोष्टी तुमच्या बाजूने घडत नाहीत, तेव्हा तुमच्यासमोर खूप आव्हाने उभी राहतात, पण अशी आव्हाने तुमच्याकडून सर्वोत्तम कामगिरी करण्यासाठी प्रयत्न करून घेतात आणि तुम्हाला यशस्वी करतात, असा अनुभव विराटने शेअर केला.

मालिकेच्या सुरुवातीला दोनदा शून्यावर बाद झालो होतो. आज पहिली धाव घेतल्यावर खूप बरे वाटले. इतके वर्ष खेळूनसुद्धा एक धाव काढणे किती कठीण असते, ते क्रिकेटने मला दाखवून दिले. ऑस्ट्रेलियामध्ये येणे आम्हाला कायमच आवडते. या देशात आम्ही खूप चांगले क्रिकेट खेळलो. इथल्या प्रेक्षकांनी आम्हाला नेहमीच भरभरून प्रेम दिले. त्यासाठी सगळ्यांचे आभार, असे म्हणत त्याने आपल्या भावनांना वाट करून दिली.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com